

महावितरणच्या कंत्राटी कामगारांचा पगारवाढीचा फरक रखडला PII

• पंढरपूर • शनिवार, १८ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - २३८



स्टार्टअपच्या प्रेरणेतून भविष्यात आणखी उद्योजक निर्माण होतील... PIII

## At a Glance

### वाघाचा पत्ता गुप्त, ताडोबाची टीम तैनात

**बार्शी :** रामलिंग अभयारण्यात



मुक्तसंचार करीत पाळीव पशुंचा बळी घेत सुटलेल्या वाघोबाचा पत्ता अखेर वनविभागाच्या पथकांना लागला आहे. सोलापूर-धाराशिव जिल्ह्याच्या सीमाभागातील एका कॅमेऱ्यात बुधवारी सायंकाळी तो ट्रॅप झाला. वनविभागाच्या पथकांनी या भागाकडे मोर्चा वळवीत गुरुवारी दुपारी वाघोबाचा शोध घेतला आहे. टिपेश्वरच्या वाघाला पकडण्यासाठी आलेल्या ताडोबा अंधेरी अभयारण्यातील कुशाग्र पथकाला वाघाचा पत्ता बुधवारी रात्री मिळाला आहे. वाघाला पकडण्यासाठी वन विभागाने ट्रप लावला आहे.

### मोटारसायकलस्वार अपघातात जागीच ठार

**पंढरपूर :** ओझेवाडी, ता. पंढरपूर



येथील ओझेवाडी ते पंढरपूर रस्त्यावर मोटारसायकल-पिकअपमध्ये झालेल्या अपघातात दयानंद साहेबराव गायकवाड (वय ५०) जागीच ठार झाले, तर मुलगा विष्णू दयानंद गायकवाड (१३) हा जखमी झाला आहे. याप्रकरणी पिकअप चालक भागवत शांतिनाथ नागणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. ओझेवाडी येथील मृत दयानंद गायकवाड हे मुलाला सोबत घेऊन ट्रॅक्टरला डिझेल आणण्यासाठी पंढरपूर ते नेपतगाव रस्त्यावरील पेट्रोल पंपाकडे जात असताना यावेळी आरोपी यांनी त्यांच्या ताब्यातील पिकअपने जोरात धडक दिल्याने अपघात झाला.

### बस-दुचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**सांगोला :** भरधाव दुचाकीने रोडच्या



विरुद्ध बाजूने येऊन एसटीला जोराची धडक दिल्याने अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. सांगोला मिरज रोडवरील जुनोनी ते तिप्पेहळी पाटी मूकबधिर शाळेसमोर घडला. दरम्यान, मृत अनोळखी इसमाची ओळख पटली नसल्याचे पोलिसांनी सांगितले. अपघातात दुचाकीस्वार जागीच मृत्यू झाला. याबाबत, एसटीचालक महादेव बाळू बंडगर (रा. रिळे, जि. सांगली) यांनी सांगोला पोलिसात अपघाताची खबर दिली आहे.

### विरोधातील अविश्वास प्रस्ताव झाला नामंजूर

**सोलापूर :** कोन्हाळी ग्रामपंचायतचे विद्यमान उपसरपंच प्रतिका संतोष बनसोडे यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव नामंजूर करण्यात आला. उपसरपंच बनसोडे यांच्यावर अविश्वास ठरावावर बुधवारी विशेष सभा घेण्यात आली. यावेळी सरपंच व नऊ सदस्य उपस्थित होते. बनसोडे यांच्या बाजूने चौघांनी मतदान केले. सदस्य संख्या दहा असल्याने अविश्वास ठरावासाठी ३/४ म्हणजे आठ सदस्यांची गरज होती. विहित सदस्य संख्या नसल्याने अविश्वास ठराव ५ विरोधात ४ ने नामंजूर झाला. चिदानंद उण्णद गटाचा अविश्वास प्रस्ताव फेटाळून लावला.

# 20 पथके तैनात




## पंढरपूरातील १७० खासगी रुग्णालयाची तपासणी सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहर व तालुक्यातील बोगस डॉक्टरांची शोध मोहिम व खाजगी रुग्णालयात रुग्णांची होणारी लूट थांबविण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने पंढरपूर शहर व तालुक्यातील १७० खासगी रुग्णालयाची तपासणी मोहिम सुरू करण्यात आली आहे. २० पथकाकडून रुग्णालयाची तपासणी करण्यात येत आहे.

अनेक गावात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे. यामुळे रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच काही खाजगी रुग्णालय शासनाच्या नियम व अटीचे पालन न करता रुग्णांची लूट करत आहेत. असे प्रकार समोर आल्याने याची गंभीर दखल आरोग्य विभागाने घेतली आहे. राज्यात महायुतीची सत्ता येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी सर्व मंत्र्यांना चांगल्या प्रकारे काम करावे अशा सूचना दिल्या आहेत.

यामुळे याची दखल घेऊन आरोग्य मंत्री यांनी बैठक घेऊन पुणे विभागातील सर्व खासगी रुग्णालयाची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बोगस डॉक्टरांची शोध मोहीम राबवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत असे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे पंढरपूर शहर व तालुक्यातील बोगस डॉक्टरांची



शोध मोहीम सुरू करण्यात आली असून शासनाच्या नियमाप्रमाणे खाजगी रुग्णालयात रुग्णांना सुविधा मिळतात की नाही याची पाहणी करण्यात येत आहे. पंढरपूर शहरात सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर महेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली १० पथके तैनात करण्यात आली आहेत. शहरातील ८१ खाजगी रुग्णालयाची तपासणी ७ ते २२ जानेवारीपर्यंत करण्यात येणार आहे. १७ जानेवारीपर्यंत ४५ रुग्णालयाची तपासणी करण्यात आली आहे. या रुग्णालयात डॉक्टरांनी दर्शनी भागावर रुग्णावर करण्यात येणारा उपचाराचा चार्ज, तक्रारपेटी, पोलिसांचा नंबर तसेच रजिस्ट्रेशन कागदपत्रे व इतर माहिती घेतली जात आहे. यात १५ रुग्णालयामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यांना याची पूर्तता करण्यासाठी पंधरा दिवसाची मुदत देण्यात आली आहे. रुग्णालयाची तपासणी २२ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

पंढरपूर तालुक्यात ८६ खाजगी दवाखाने आहेत. याची तपासणी २० ते २३ जानेवारी या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एकनाथ बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली १० पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके प्रत्येक रुग्णालयात जाऊन शासनाच्या नियमाप्रमाणे रजिस्ट्रेशन झाले आहे का? वेगवेगळ्या सुविधा रुग्णांना देण्यात येतात का? याची पाहणी करण्यात येत आहे. तसेच बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या वतीने पंढरपूर शहर व तालुक्यातील खाजगी रुग्णालयाची तपासणी व बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येत असल्यामुळे डॉक्टरात खळबळ उडाली आहे. मात्र रुग्णांची होणारी लूट थांबणार आहे. अनेक खाजगी रुग्णालयात उपचार केल्यानंतर काही रुग्णाचा मृत्यू होतो. मात्र रुग्णालयाची फी भरल्याशिवाय नातेवाईकांना मृतदेह देण्यास डॉक्टर तयार होत नाहीत. अशा घटना घडल्या आहेत. याची गंभीर दखल आरोग्य विभागाने घेतली असून कोणत्याही रुग्णालयाला मृत झालेल्या व्यक्तीस थांबवून ठेवण्याचा अधिकार नाही.यामुळे याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे की नाही याचीही पथकाकडून पाहणी करण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाचा शनिवारी,रविवारी मेळावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत विचार विनिमय करण्यासाठी व पक्ष बळकट करण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाचा शिर्डी येथे शनिवार रविवार १८ व १९ जानेवारी रोजी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे. यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पुन्हा यश मिळविण्यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर शनिवार, रविवार दोन दिवस शिर्डी येथे पक्षाचा मेळावा घेण्यात आला आहे. या मेळाव्यास पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा विनिमय करण्यात येणार असून राज्यात राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाची ताकद वाढविण्यासाठी मोर्चे बांधणी करण्यात येणार आहेत. तसेच निवडणुकीबाबत पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मते जाणून घेण्यात येणार असून काही जिल्ह्यात नवीन पदाधिकारी निवड करण्याबाबत चर्चा



करण्यात येणार आहे. या मेळाव्याकडे राज्यातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. काही दिवसापूर्वी शिर्डी येथे भाजपने मेळावा घेतला होता. याच धर्तीवर आता राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाने मेळावा घेतला आहे.



### मंत्रिमंडळातून कामं होण्यास कोणतीही अडचण नाही

**सोलापूर :** मंत्रिमंडळातून आमची कामं होण्यास कोणतीही अडचण नाही, फक्त पराभूत लोकं मध्ये लुडबुड करतात असा टोला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी राम सातपुते यांचे नाव न घेता लगावला. त्यांच्यावर यापूर्वीच बोललेलो आहे, त्यामुळं आमच्यासाठी तो विषय संपला आहे अशा एका वाक्यात सातपुते यांच्या आरोपांना मोहिते पाटील यांनी प्रतित्युत्तर दिलं. उजनी धरणग्रस्तांसाठी बोलावलेल्या बैठकीनंतर खासदार धैर्यशील मोहिते पाटील प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

## माळशिरस पोलिसांनी लावला जनावर चोरीचा छडा; दोन आरोपी ताब्यात



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** माळशिरस येथील पोलीस पोलीस ठाण्याच्या हद्दीत जनावरे चोरी करणाऱ्या दोन आरोपींना माळशिरस पोलिसांनी अटक केली त्यांच्याकडून दोन जर्सी गाई व एक म्हैस जप्त केले आहे. ज्ञानेश्वर अज्ञान खांडेकर रा. गोटेवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर, विकास तानाजी खरात रा. बचेरी ता. माळशिरस जि. सोलापूर असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

बचेरी ता. माळशिरस येथील मारुती मुगा काळे यांच्या दोन जर्सी गाय व एक म्हैस शेतात बांधलेल्या असताना कोणी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या अशी फिर्याद 14/ 12/ 2024 रोजी माळशिरस पोलीस ठाण्यात दिली होती. या चोरीचा छडा लावण्यासाठी पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी पोलिसांचे पथक » पान ३ वर

## राज्यातील ३४ सरपंचांना दिल्ली येथील कार्यक्रमाचे निमंत्रण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ग्रामीण भागाच्या




विकासासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करत आहे. अनेक ग्रामीण भागात सरपंच चांगले काम करत आहेत. या कामाची दखल घेऊन केंद्र सरकारने प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी होणाऱ्या नवी दिल्ली येथील खास परेड कार्यक्रमासाठी राज्यातील ३४ सरपंचांना निमंत्रण देण्यात आले आहे. यामुळे सरपंचातून आनंद व्यक्त होत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासन निधी देत आहे. या निधीतून ग्रामस्थांना सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून उपाय योजना करण्याची जबाबदारी सरपंचावर आहे. तर काही सरपंच चांगले काम करत आहेत. या कामाची पाहणी पंचायत राज मंत्रालय नवी दिल्लीकडून करण्यात येते. राज्यातील अनेक ग्रामपंचायतीची पाहणी पंचायत राज मंत्रालयाच्या पथकाने केली आहे. यातील सरपंचाच्या कामाची दखल घेऊन राज्यातील ३६ सरपंचांना प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या परेड कार्यक्रमात खास अतिथी म्हणून निमंत्रण देण्यात आले आहे. सरपंचा बरोबर त्यांच्या कुटुंबास उपस्थित राहण्याचा मान देण्यात आला आहे. केंद्र सरकारने सरपंचाच्या कामगिरीची दखल घेऊन सरपंचाचा सन्मान केल्याबद्दल सरपंच आतून आनंद व्यक्त होत आहे.

### युवकाची आत्महत्या; आत्महत्येचे कारण अज्ञात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शीतील सुप्रसिद्ध



व्यावसायिक आणि पवार भेळचे मालक विलास पवार यांनी अज्ञात कारणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विलास पवार हे बार्शी शहरातील प्रतिष्ठित व्यापारी होते. त्यांच्या पवार भेळ व्यवसायामुळे ते शहरात लोकप्रिय होते. मात्र, त्यांच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ हजेरी लावून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे. प्राथमिक तपासात काही कारण समोर आलेले नाही.

## सोलापुरातील ८ आरोपींना जन्मठेप तर, तिघांना २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापुरात रिक्षातून दररोज शाळेला जाणाऱ्या मुलीची चालकासोबत चांगली ओळख झाली. त्याने विश्वास संपादित करून मैत्रीचा हात पुढे केला. पुढे ते एकमेकांसोबत बोलू लागले.

पण, एकेदिवशी त्या तरुणाने अल्पवयीन मुलीसोबत जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर काही दिवसांतच ११ जणांनी आळीपाळीने सतत अत्याचार केले. अल्पवयीन पीडितेच्या आर्थिक व कौटुंबिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन तिच्या अत्याचार करणाऱ्या नराधमांना शिक्षा होण्यासाठी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांनीही कोर्टात अचूक युक्तिवाद केला.



जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी गुन्ह्यातील आठ आरोपींना जन्मठेप तर, तिघांना २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

ऑगस्ट २०१९ मध्ये रिक्षातून शाळेत जाणाऱ्या पीडितेची ओळख चालक सचिन श्रीकांत राठोड याच्यासोबत झाली. काही दिवसांतच ओळखीतून मैत्री आणि पुढे प्रेमात रूपांतर झाले. मुलीचा विश्वास बसल्याची खात्री » पान ३ वर

> या गुन्ह्यात पीडितेने स्वत:हून फिर्याद दिली नव्हती, एका सामाजिक कार्यकर्त्याने वाचा फोडली. पोलिस चौकशीनंतर गुन्हा उघड झाला. त्या सामाजिक कार्यकर्त्याने ही बाब समोर आणली नसती तर कदाचित गुन्हा समोर आला नसता. पीडितेच्या आर्थिक परिस्थितीचा आरोपींनी गैरफायदा घेतला होता. गुन्ह्याच्या सुनावणीवेळी ३८ साक्षीदार तपासले, घटनास्थळाचा पंचनामा, वैद्यकीय अहवाल, असे सर्व पुरावे आरोपींविरुद्ध होते. आमचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायालयाने आरोपींना शिक्षा ठोठावली व पीडितेला न्याय मिळाला.

## तपासणीसाठी एकाच दिवशी एक हजार नमुने घेतले

# भेसळयुक्त दुधावर करडी नजर

■ 'पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात भेसळक्त दुधाचे प्रमाण वाढले आहे. यामुळे बालके व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. याची गंभीर दखल अन्न व औषध प्रशासनाने घेतली असून मंत्री नरहरी झिरवळ यांनी अधिकाऱ्यांना भेसळयुक्त दूध करणाऱ्या वर कडक कारवाई करा असे आदेश दिले आहेत. यामुळे अन्न व औषध प्रशासनाने १५ जानेवारी रोजी एकाच दिवशी राज्यातील एक हजार दुधाचे नमुने घेतले आहेत. याची तपासणी करण्यासाठी ते प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

राज्यात दुधाला चांगली मागणी आहे. दरही चांगला मिळत आहे. यामुळे अनेकजण दुग्ध व्यवसायाकडे वळले आहेत. दुधास चांगली मागणी असल्याने याचा




फायदा घेण्यासाठी अनेकजण भेसळयुक्त दूध तयार करत आहेत. यामुळे बालके व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. राज्यात अनेक जिल्ह्यात भेसळयुक्त दूध तयार करणाऱ्या टोळ्या या अगोदर अन्न व औषध प्रशासनाने पकडल्या आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. आता पुन्हा भेसळयुक्त दूध तयार करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या असून या डोळ्यांना पायबंध घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना राज्यातील दुधाची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.यासाठी ११० अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. १५ जानेवारीपासून राज्यातील दूध तपासणी मोहिम सुरू करण्यात आली आहे. दूध उत्पादक वितरक विक्रेते रस्त्यावरील विक्रेते यांच्याकडून दूध घेऊन याची तपासणी करण्यात येत आहे. १५ जानेवारी रोजी एकाच दिवशी एक हजार दुधाचे नमुने घेण्यात आले आहेत. हे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. याचा अहवाल आल्यानंतर कारवाई करण्यात येणार आहे. राज्यात भेसळयुक्त दुधावर करडी नजर ठेवण्यात आली असल्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

पंढरी संचार

### उसाच्या ट्रॅक्टरखाली बालिकेचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** ऊस वाहतूक करणाऱ्या




ट्रॅक्टरचे चाक चेहऱ्या वरून गेल्याने तीन वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना अक्कलकोट तालुक्यातील म्हैसलगी येथे गुरुवारी सकाळी नऊ वाजता घडली. मनीष मुकेश काजल (वय ३, रा. करवानी, ता. खालवा, जि. खांडवा, मध्य प्रदेश, सध्या अक्कलकोट, म्हैसलगी) असे मृत्यू पावलेल्या बालिकेचे नाव आहे. मध्य प्रदेशातील हे कुटुंब सध्या ऊसतोडीसाठी महाराष्ट्रात आले आहे. वडील मुकेश यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात आणले. तिथे मृत घोषित केले.

## रद्दी खरेदीसाठी दरपत्रक देण्याचे आवाहन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा माहिती कार्यालयातील वर्तमानपत्रांची रद्दी विकण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत असून, इच्छुकांनी या कार्यालयाची रद्दी खरेदी करण्यासाठी दरपत्रक सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सोलापूरच्या वतीने करण्यात आले आहे जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी ( मराठी व इंग्रजी ), जुने मासिके पाहण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून , दरपत्रके तीन प्रतीत बंद पाकीटात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर. या नावाने 27 जानेवारीपर्यंत पाठवावेत.

**सोलापूर :** राज्य शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी समितीची बैठक दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. वर्षभरात तालुक्यातील 18 अपघातग्रस्त प्रकरणांचे दावे प्राप्त झाले होते. त्यापैकी पाच दावे निकाली काढत मृतांच्या वारसाला प्रत्येकी दोन लाखांचे शासकीय मदत देणारे दावे मंजूर करण्यात आले आहेत. मात्र 13 प्रकरणांच्या फाईली त्रुटीमुळे प्रलंबित ठेवाव्या लागल्या आहेत.

### खा.धैर्यशील मोहिते पाटील यांना निवेदन

# महावितरणच्या कंत्राटी कामगारांचा पगारवाढीचा फरक रखडला

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** महावितरण कंपनीच्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना कायम कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने मासिक पगारामध्ये 19% पगारवाढ तीन महिन्यापूर्वी जाहीर केली होती. तसेच ही पगारवाढ माहे एप्रिल 2024 पासून लागू केली होती, फरक रक्कम दिवाळीपूर्वी

> खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी महावितरणच्या कंत्राटी कामगारांच्या पगारवाढीच्या रखडलेल्या फरकाबाबत सोलापूर चे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्याशी चर्चा करून तात्काळ कंत्राटी कामगारांना पगारवाढीचा फरक द्यावा अशी सूचना केली.

जमा करणे कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने गरजेचे होते.परंतु पगारवाढ जाहीर होऊन तीन महिने होऊनही एप्रिल 2024 पासून वाढीव फरक रक्कम जमा केली नसल्याने सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर पगारवाढीची रक्कम जमा व्हावी यासाठी पाठपुरावा करावा असे निवेदन माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना देण्यात आले.



महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभाजित कंपन्या निर्मिती,पारेषण,वितरण मधील ४२००० कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर ९ सप्टेंबर २०२४ रोजी तत्कालीन ऊर्जामंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगाराच्या मूळ वेतनामध्ये कायम कामगाराप्रमाणे १९% पगारवाढ देऊन कंत्राटी कामगारांना १ एप्रिल २०२४ पासून पगारवाढ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सदर निर्णय जाहीर होऊन तीन महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापही पगार वाढीचा फरक जमा न झाल्याने कंत्राटी कामगारांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना निवेदन देताना महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कस फेडरेशन चे सदस्य उपस्थित होते.

## कामगारांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेतील 249 बदली व रोजंदारी कर्मचाऱ्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या सेवेत कायम करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र शासनाकडे दुरुस्ती प्रस्ताव सोलापूर महानगरपालिकेने पाठवून दिल्याबाबत सर्व बदली व रोजंदारी कामगार यांच्या वतीने आनंद चंदनशिवे यांनी सोलापूर महानगरपालिका आयुक्त व उपायुक्त यांच्या कार्यालयात विस्तारीत चर्चा झाली. प्रस्ताव पाठवल्यानिमित्त सो. म. पा. आयुक्त व उपायुक्त यांचे आभार मानले.

**» Selected**

## सिद्धेश्वर मंदिरात महिलेचे मंगळसूत्र पळविले

**सोलापूर :** सोलापूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र पळविण्यात आल्याची घटना घडली आहे. मीनाक्षी मल्लाप्पा बुक्का (वय 39 राहणार भारतरत्न इंदिरा गांधीनगर, अशोक चौक ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बुक्का यांच्या गळ्यातील वीस हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## आमदार देशमुख यांचा होटगी स्टेशन येथे जनसंवाद दौरा



**सोलापूर :** आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूर दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील होटगी स्टेशन येथील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी नागरिकांना येणाऱ्या समस्या तसेच विविध मागण्यांबाबत चर्चा करून आगामी काळात यावर कार्यवाही करून तालुक्यासह गावाची देखील प्रगती करण्यासाठी काम करण्याचे आश्वासन दिले. यावेळी आनंद सिंग राजपूत, बापू कोकरे, ईश्वर टेंगले, जयवंत शिंदे, सुभाष लोखंडे, बाप्पा भोसले आदी उपस्थित होते.

## महेश जमदाडेची सायकल भ्रमंती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** भारतातील जनतेला, "एक भारत श्रेष्ठ भारत हमारा देश हमारा नाम" असा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी माळशिरस येथील युवक महेश जमदाडे या युवकाने सायकल प्रवास सुरू केला आहे. आत्तापर्यंत 10 हजार 290 किलोमीटर प्रवास पूर्ण झाला असून 500 किलोमीटर प्रवास बाकी आहे. नाशिक येथील पंचवटीला भेट देऊन भीमाशंकर येथे सायकल प्रवासाची संगता जमदाडे करणार आहे. जमदाडे यांच्या सायकलवारी प्रवासाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## फसवणूक, घरफोडीप्रकरणी एकाला अटक; पोलिसात गुन्हा दाखल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मंगळसुत्राच्या बदल्यात जास्तीचे सोने देतो, म्हणून मोहोळ शहरात महिलेची फसवणूक करून गळ्यातील अर्धा तोळयाचे मंगळसूत्र पळवून नेले होते. तर आष्टीच्या घरफोडी प्रकरणातील ३ लाख ५० हजार रुपये चोरीच्या प्रकरणातील आरोपीला पकडण्यात मोहोळ पोलिसांच्या गुन्हे शाखेला यश आले आहे. दोन्ही गुन्ह्यातील मिळून पावणे चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपी सद्या पोलिसांच्या ताब्यात असून पोलिस या आरोपीच अधिक तपास करीत आहेत. या आरोपीकडून अजून गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.


## बैठक...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** सोलापूर जिल्हाधिकारी यांना, खा. धैर्यशील मोहिते-पाटील व आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील उजनी प्रकल्पग्रस्त व गावठाण पुनर्वसनासंदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर बैठक घेण्यात यावी म्हणून विनंती केली होती त्या अनुषंगाने आज पंढरपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. याप्रसंगी आ.अभिजीत पाटील व आ.समाधान आवताडे उपस्थित होते.

## दर पडल्याने शेतकऱ्यानी टोमॅटोची झाडे काढली



**पंढरपूर :** सध्या टोमॅटो दर कमी झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून काही शेतकऱ्यांनी टोमॅटो झाडे कढून टाकली आहेत. सध्या टोमॅटो दर प्रति किलो 10, 20 रुपयांवर आले आहेत. त्यामुळे पंढरपूर मधील चिंचणी मधील शेतकऱ्यांनी टोमॅटो झाडे तोडली आहेत. त्यामुळे सगळ्या शेतात लाल टोमॅटो पसरली आहेत. दर घसरल्याने शेतकऱ्यांवर अशी वेळ आली आहे.

# ग्रीन फिंगर्स महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्वा बरोबरच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. परंतु अलीकडच्या काळात मोबाईल- इंटरनेटच्या वापरामुळे देशाचा तरुण वाचन संस्कृती पासून दुरावत चाललेला असल्याचे आढळून येते. त्या दृष्टीने तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढवण्याकरिता 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा अभिनव उपक्रम विविध महाविद्यालय, ग्रंथालये या ठिकाणी राबविण्याचे शासनाने कळवले होते .त्या अनुषंगाने ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी अकलूज या महाविद्यालयात सदर उपक्रम ग्रंथालय विभाग समिती मार्फत राबविण्यात आला या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या पुस्तकाचे वाचन करण्यास साठी प्रोत्साहन दिले .१ ते १५जानेवारी २०२५ या दरम्यान हा उपक्रम राबवण्याचे शासनाने धोरण ठरवले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ करणे ,विविध साहित्य प्रकाराची ओळख करून देणे व महाविद्यालयांमध्ये वाचण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे हा प्रमुख उद्देश ठेवून महाविद्यालयामध्ये या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये बीसीए व बीएससी कॉम्प्युटर सायन्स मधील विद्यार्थ्यांनी उत्साह पूर्ण सहभाग नोंदवून महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये व परिसरात वाचन केले. या उपक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाचे अनेक फायदे समजून सांगितले .विद्यार्थ्यांबरोबरच इतर व्यक्तींना देखील वाचनाची गोडी असावी, यामुळे भाषा कौशल्य आणि शब्दसंग्रह वाढतो कल्पनाशक्ती एकाग्रता तर्कशक्ती विकसित होते व अनेक प्रकारचे साहित्य आपल्याला माहिती होते. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील सहभाग नोंदवला .

या उपक्रमामुळे वाचन ही विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची सवय आहे. वाचन संकल्प उपक्रम विद्यार्थ्यांना सर्जनशील आत्मविश्वासू आणि साक्षर समाज बनवण्यासाठी एक प्रभावी पाऊल आहे असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व्यक्त केले.

# माळशिरस तालुका मराठी पत्रकार दिनदर्शिकेचे कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रकाशन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस -** माळशिरस तालुका पत्रकार यांच्या वतीने काढण्यात आलेल्या २०२५ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन नुकतेच कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते त्यांच्या निवासस्थानी संपन्न झाले.यावेळी जेष्ठ पत्रकार अशोक सिदवाडकर, आनंद शेंडगे ,बंडू पालवे, संजय हुलगे,स्वप्नीलकुमार राउत उपस्थित होते.यावेळी मंत्री जयकुमार गोरे यांनी संपूर्ण दिनदर्शिकेची पाहणी करून पत्रकारांच्या या उपक्रमाबद्दल कौतुक केले.हि दिनदर्शिका सुबक,आकर्षक व स्पष्ट छपाई केल्याने नागरिकांच्या पसंतीस येत असून कार्यालयीन वापरासाठी मागणी होत आहे.



या दिनदर्शिकेस माढा लोकसभा मतदार संघाचे मा.खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माळशिरस तालुक्याचे विधानसभा मा.आमदार रामभाऊ सातपुते, यांनी शुभेच्छा देऊन या स्तुत्य उपक्रमाचे अभिनंदन केले. काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे हे 2 रे वर्ष असून यास जाहिरातदारांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या दिनदर्शिकेचे माळशिरस तालुक्यातील शासकीय, निमशासकीय ठिकाणासह विविध कार्यलयात वितरण करण्यात आले आहे.

## भारताच्या नकाशाचा चुकीच्या पद्धतीने वापर




**सोलापूर :** बार्शीत एका कार्यक्रमात भारताच्या नकाशाचा अवमान करण्यात आल्याचा आरोप केला गेला आहे. या प्रकरणी विश्व हिंदू परिषदेचे बार्शी प्रखंड मंत्री गहिनीनाथ उर्फ बापूसाहेब कदम (वय 47, व्यवसायिक) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, फिर्याद दाखल झाली आहे. कदम आपल्या मित्रासोबत नाळे प्लॉट येथून जात असताना हजरत शेख फरिव कमाणी जवळ स्टेजवर लावलेला डिजिटल बोर्ड दिसला. या बोर्डवर भारताचा नकाशा तिरंगा रंगात दाखवण्यात आला होता, मात्र त्यामध्ये अशोक चक्राऐवजी मस्जिदीचा घुमट दर्शवण्यात आला होता.




गीर गाईचे शुद्ध दूध मिळेल. त्वरित संपर्क साधा

आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### मावळा प्रतिष्ठान च्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती साजरी

# खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील कुरूल येथील मावळा प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमास खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहुन राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नतमस्तक झाल्या.

सर्वांचे स्वागत रामभाऊ लांडे यांनी केले. तसेच यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा व सोलापूर जिल्हा प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी आपले विचार व्यक्त करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वराज्य



निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्यात मॉंसाहेब जिजाऊंचा मोलाचा वाटा होता. हिंदवी स्वराज्याचं बीज छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात रोवलं, त्यांच्या अंगी अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती बाणवली त्याला खतपाणी दिलं, जोपासलं वेळप्रसंगी रणांगणात तलवारही हाती घेण्यात त्या मागे हटल्या नाहीत. त्यांनी शिवरायांच्या मनावर कर्तव्यनिष्ठा आणि सर्वांना एकत्र घेऊन वाटचाल करण्याचे संस्कार केले आणि त्यातूनच १८ पगड जातींना एकत्र घेऊन हिंदवी स्वराज्य निर्माण केले. आदर्श माता, कुशल राज्यकर्त्या स्वराज्य जननी जिजाऊ मॉंसाहेब यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, त्यांचाच आदर्श घेऊन आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत. अश्याच कर्तृत्ववान भगिनींचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, रामभाऊ लांडे पाटील, डॉ. स्मितताई पाटील, शिवाजी जाधव, दीपक जाधव, दीपक पाटील, बाळासाहेब लांडे, तात्यासाहेब बाबर, मेजर निकम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील बंकलगी येथील नागरिकांनी आपल्या विविध मागण्यांचे व समस्या सोडविण्याचे निवेदन आमदार सुभाष देशमुख यांना दिले. यावेळी सरपंच चंद्राम सगरे, उपसरपंच नागनाथ कोणदे, सिध्दाराम मंगळुरे, नागंनाथ बनसोडे, जगनाथ बनसोडे, हणंमत वागमारे, यांच्यासह सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष राजशेखर सगरे, बंकलगी गावचे विद्यमान विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन बसवराज गुरव, हणंमत सगरे, माणिकराव देशमुख, तंटामुक्त अध्यक्ष मल्लिकार्जुन चेंडके आदी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वेरीत 'नॅशनल स्टार्टअप डे' कार्यक्रम संपन्न

# स्टार्टअपच्या प्रेरणेतून भविष्यात आणखी उद्योजक निर्माण होतील- सौ.डुबल

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** स्वेरीमध्ये 'नॅशनल स्टार्टअप डे' चे उदघाटन करताना व्हेंडाफोरएस च्या सीईओ तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.स्मिता डुबल सोबत डावीकडून प्रा.एस.एम. शिंदे, उद्योजक श्रेयस कुलकर्णी, डॉ.ए.पी.केने, उद्योजिका तृप्ती जाधव, सीईओ सौ.स्मिता डुबल, डॉ. एस.पी पवार तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्हेंडाफोरएस च्या सीईओ तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.स्मिता डुबल.

**पंढरपूर :** 'उद्योग क्षेत्रामध्ये काम करत असताना सहवासातून व अनुभवातून आपल्या मनात नवनवीन संकल्पना निर्माण होत असतात. त्या संकल्पनांचे उत्पादनामध्ये रुपांतर करून तसेच आपल्या उत्पादनाचे जागतिक बाजार पेठेत सादरीकरण करून भविष्यात फायदे होऊ शकतात. 'स्टार्टअप'चा होणारा फायदा समाजाच्या पसंतीस पडणे आवश्यक असते. त्यामुळे स्टार्टअपच्या प्रेरणेतून भविष्यात आणखी उद्योजक निर्माण होतील.' असे प्रतिपादन व्हेंडाफोरएस च्या सीईओ तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.स्मिता डुबल यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग आणि 'इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल' यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीच्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉल मध्ये 'नॅशनल स्टार्टअप डे' आयोजित केला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्हेंडाफोरएसच्या सीईओ तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.स्मिता डुबल ह्या मार्गदर्शन करत होत्या. दीपप्रज्वलनानंतर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे माजी विद्यार्थी व श्रेयस पॉवर सोल्युशन्स चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रेयस कुलकर्णी यांनी 'आयडिया पासून ते स्टार्टअप पर्यंतचा प्रवास सांगताना म्हणाले की, 'अभियांत्रिकी उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरी शोधण्यापेक्षा स्वतःचा उद्योग उभा केल्यास भविष्यात खूप फायदा होतो व इतरांना देखील रोजगार देता येतो. माझ्या कंपनीसाठी सुरुवातीला प्रतिसाद न देणारे आता ते उत्तम भागीदार झाले असून ट्रान्सफॉर्मर क्षेत्रात आपला व्यवसाय उत्तम करत आहेत. स्वेरीमध्ये डिप्लोमा आणि डिग्री मधून शिक्षण घेत असताना उत्तम मार्गदर्शन मिळाले. याच कारणामुळेच मला आज नोकरीपेक्षा उद्योगधंदा करण्याची आवड निर्माण झाली. आज वार्षिक टर्नओव्हर साडेचार कोटी रुपये पर्यंतचा आहे. कोणताही उद्योग यशस्वी होण्यासाठी आपल्याला अथक परिश्रम मात्र घ्यावे लागतात.' असे सांगून उद्योजक होण्यासाठी भांडवल, संपर्क आणि आपल्या उद्योगाचे सादरीकरण, गुंतवणूक, वाहतूक व्यवस्था आदी बाबत महत्वाची माहिती दिली. श्रेयस पॉवर सोल्युशन्स कंपनीमध्ये सध्या १६ केव्हीए पासून ३२५ केव्हीए पर्यंत ट्रान्सफॉर्मर बनविले जातात व दुरुस्तीही केली जाते. म्हणून आपल्या मनातील संकल्पनांना वाव द्या. भावी उद्योजकांना माझे नेहमी सहकार्य राहील. तुम्ही हाक द्या, मी साथ देईन.' असेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना सीईओ सौ. डुबल म्हणाल्या की, 'स्टार्टअप डे' हा उद्योजकांना प्रेरणा देण्यासाठी साजरा केला जातो. यासाठी आपल्यातील आयडीया आणि सकारात्मक विचारसरणी या बाबी उद्योग क्षेत्रात अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात.' असे सांगून त्यांनी स्टार्टअप बाबतीत महत्त्वपूर्ण माहिती दिली. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख डॉ. एस.पी. पवार यांच्या नेतृत्वाखाली व स्वेरीच्या 'इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल'चे अध्यक्ष प्रा. दिग्विजय डी. रोंगे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्योजिका तृप्ती जाधव, स्वेरीचे संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी.केने, प्रा.एस.एम. शिंदे यांच्यासह इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. पी.ए. सातारकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## बांग्लादेशींची घुसखोरी ५ महिला ताब्यात




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शीतील पंकज नगर भागात बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी उघड झाली असून, याप्रकरणी पाच महिलांना ताब्यात घेण्यात आले आहे. दहशतवादी विरोधी पथक सोलापूर युनिट आणि बार्शी पोलिसांच्या संयुक्त कारवाईत हा प्रकार उघडकीस आला. त्यांच्याकडून एकूण १. ४१ लाख रुपयांची रोख रक्कम, ४६ हजार रुपयांचे मोबाईल फोन, बनावट आधार कार्ड, तसेच बांगलादेशी मतदान कार्ड जप्त करण्यात आले आहे. या महिलांची नावे नजमा यासीन शेख, रेहना बेगम समद शिकंदर, अरजिना खातून अन्वर शेख, शिखा शाकिब बुहीया, शाकिब बुहीया, आणि शोएब सलाम शेख अशी आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

» पान १ वरुन

## माळशिरस पोलिसांनी लावला जनावर...

नेमले होते. गोपनीय माहिती नुसार दोन आरोपींना अटक करण्यात आले व त्यांच्याकडून दोन जर्सी गाय व एक म्हैस ताब्यात घेण्यात आले. व चोरीसाठी वापरण्यात आलेले पीकअप वाहन जप्त करण्यात आले. सदर फिर्यादी हा सामान्य शेतकरी असून त्यास गाई व म्हैस परत दिल्यानंतर त्यांनी समाधान व्यक्त केले. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस नाईक दत्तात्रय खरात करीत आहेत.

सदरचे कामगिरी अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण प्रीतम यावलकर अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर नारायण शिरगावकर उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली नारायण पवार पोलीस निरीक्षक माळशिरस पोलीस ठाणे, पोलीस हेडकॉन्स्टेबल संतोष घोगरे,पोलीस नाईक दत्ता खरात,पोलीस कॉन्स्टेबल अजित कडाळे, सायबर शाखेचे युसुफ पठाण यांनी केली.

## सोलापुरातील ८ आरोपींना जन्मठेप तर...

करून सचिनने लग्नाचे आमिष दाखवून लॉजवर नेऊन जबरदस्तीने अत्याचार केले. तिला रंगभवन चौकात सोडले, त्यावेळी राज ऊर्फ राजकुमार सिद्राम देसाई याने तिला रिक्षात बसवून नेऊन अत्याचार केला. त्याच दिवशी सायंकाळी प्रवीण श्रीकांत राठोड यानेही शहराबाहेर नेऊन अत्याचार केले. काही दिवसांनी प्रवीणचा मित्र आनंद ऊर्फ राजवीर राठोड यानेही अत्याचार केले. त्यानंतर गणेश ऊर्फ अक्षय विष्णू चव्हाण व सतीश अशोक जाधव या दोघांनी पीडितेला रिक्षातून शहराजवळील जंगलात नेऊन आळीपाळीने अत्याचार केले.

काही दिवसांनी प्रवीणने पीडितेला तिच्या महाविद्यालयाकडे रिक्षातून नेले. त्याठिकाणी थांबलेल्या अक्षय व रोहित श्याम राठोड या दोघांनीही त्यांच्या कारमध्येच अत्याचार केले. एकेदिवशी पीडिता कॉलेजमधून घरी जात असताना रोहित राठोड व टिकटॉक किंग दिनेश परशू राठोड आणि चेतन राम राठोड यांनीही कारमध्ये सामुहिक अत्याचार केले. गौरव विलास भोसले यानेही लग्नाच्या अमिषातून अत्याचार केला. न्यायालयात या गुन्ह्याची सुनावणी सुरु असताना उपस्थितांच्याही अंगावर शहारे उभारले होते.

तब्बल ११ जणांच्या सततच्या जबरदस्तीच्या अत्याचाराला त्रासून आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या त्या पीडितेचे रडणे मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या एका सामाजिक कार्यकर्त्याच्या कानावर पडले आणि त्यांनी तिला धीर दिला. त्या सामाजिक कार्यकर्त्याने पीडितेला घेऊन थेट पोलिस ठाणे गाठले. तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे यांनी यांनी स्वत: गुन्ह्याचा तपास केला आणि आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात पाठविले. त्यातून आरोपींना कठोर शिक्षा लागली.

## शासकीय ड्रॉइंग ग्रेड परीक्षेमध्ये श्रीदत्त विद्यामंदिर प्रशालेचे सुयश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर संचलित,श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, सुस्ते प्रशालेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कला संचलनालय, मुंबई यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या ड्रॉइंग ग्रेड परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. एलिमेंटरी परीक्षेमध्ये 29 तर इंटरमिजिएट परीक्षेमध्ये 20 अशा एकूण 49 विद्यार्थ्यांनी हे यश मिळवल्याने प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. ग्रेड परीक्षेच्या प्रमाणपत्रांचे वाटप जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे व पत्रकार अंबादास वायदंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकार दिनाचे औचित्य साधून प्रमुख मान्यवर सिद्धार्थ ढवळे व अंबादास वायदंडे यांचा सत्कार प्रशालेच्या वतीने प्राचार्य सुधाकर पिसे यांनी केला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे व मार्गदर्शक शिक्षक श्रीकांत चंदनशिवे यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रा. शिवाजी वाघ, सचिव ॲड. वैभव टोमके, सहसचिव अजित नडगिरे, खजिनदार सलीम वडगावकर, ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, दिलीप घाडगे,अनिरुद्ध सालविठ्ठल, विजयकुमार माळवदकर, सुनिता मोरे, प्राचार्य सुधाकर पिसे, पर्यवेक्षक रणजीत शिनगारे, ज्येष्ठ लिपिक राजकुमार ढगे, शिक्षक प्रतिनिधी राजेंद्र जाधव, जेष्ठ शिक्षक, सुरेश कट्टे, जैनुद्दीन शेख व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बक्षीस वितरण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, सुस्ते प्रशालेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कला संचलनालय, मुंबई यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या ड्रॉइंग ग्रेड परीक्षेमध्ये उज्ज्वल यश संपादन केले. त्याचा बक्षीस वितरण समारंभ पत्रकार सिद्धार्थ ढवळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसमी उपस्थिती मान्यवर.

## Selected

## खा. शिंदे व आ. देशमुखांची कार्यक्रमास उपस्थिती



**सोलापूर :** उमेद ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर द्वारा मिनी सरस व जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन रुक्मिणी महोत्सव वोरोनोका प्रशाला येथे आयोजित करण्यात आले होते. महोत्सवाला सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे व सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या अंतर्गत महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले होते.

### पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

जा.क्र./पंनपं/आरोग्य/३४४/२०२५ — दि. १७/०१/२०२५

**दर कोटेशन**

सर्व मक्तेदार, मजूर सह.संस्था, कंपनीधारक यांना कळविणेत येते की, मे शासनाव्दारे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत माहिती, शिक्षण, प्रचार व प्रसार (IEC) या घटकासाठी निधी प्राप्त झालेला आहे. सदरचा निधी शासनाने निर्देशाप्रमाणे अंतर्गत विविध उपक्रम राबविणेसाठी कामाच्या तपशीलानुसार सद्यस्थितीत असणाऱ्या बाजार भावाच्या दराप्रमाणे दर सादर करावेत. तसेच त्यामध्ये आपल्या लेटरपॅडवर करण्यात येणाऱ्या कामाच्या तपशिलानिहाय वेगवेगळे स्वतंत्र सर्व करांसहीतचे दर सादर करावेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजित दर |
|---|---|---|
| १. | जनजागृती, प्रचार व प्रसार (IEC) अंतर्गत वेस्ट टू बेस्ट उपक्रम राबविणे. (कलाकृती साईज व उपलब्ध जागेवर बसवून देणेनुसार दर देणे) | |
| २. | जनजागृती, प्रचार व प्रसार (IEC) अंतर्गत पंढरपूर शहर व उपनगरात विविध ठिकाणी रंगकाम करणे. ( स्क्वेअर फुट नुसार दर देणे) | |

तरी इच्छुक पुरवठाधारकांनी याबाबतचे दर नगरपरिषद कार्यालयात आपल्या लेटरहेडमध्ये भरुन द्यावयाचे आहेत. तरी दि. १८/०१/२०२५ ते दि. २१/०१/२०२५ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कोटेशन हे नगरपरिषद कार्यालयात आरोग्य विभागात समक्ष देण्यात यावेत. सदर कोटेशन दि. २१/०१/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजता उघडण्यात येईल.

**सही/-**
**(डॉ.प्रशांत जाधव)**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर**

## सिंहगड महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय स्टार्टअप दिन साजरा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोर्टी पंढरपूर मध्ये दिनांक १६ जानेवारी रोजी राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजरा केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली.

उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि उद्योग मंत्रालयाने १० ते १६ जानेवारी हा संपूर्ण आठवडा राष्ट्रीय स्टार्टअप सप्ताह म्हणून चिन्हांकित केला आहे. स्टार्टअप समुदायाच्या यशाचा उत्सव साजरा करण्यासाठी भारतात राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजरा केला जातो. स्टार्टअप व्यवसाय मालकांना नवकल्पना, नवनिर्मीती प्रकल्प आणि उदयोजकतेचा विकास, अर्थव्यवस्थेतील त्यांच्या योगदानाबद्दलची माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिली. सिंहगड इंक्युबॅशन सेंटर मधील स्टार्टअप व्यवसाय मालकांना समाजाचे प्रतिनिधीत्व करण्याचा हेतू या राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाचे औचित्य साधून एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले.

या कार्यशाळेमध्ये १५० होऊन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अतुल आराध्ये , धनंजय गिराम, रमेश येवले, किशोर जाधव, अनिता शिंदे, मिलिंद तोंडसे तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## विवेकानंद जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धा व कलोत्सव 2025 चे आयोजन !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गेली सतरा वर्षे पंढरीत कार्यरत असणाऱ्या कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने पंढरीतील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून प्रतिवर्षी विवेकानंद जयंती निमित्त वक्तृत्त्व स्पर्धेचे व कलोत्सव २०२५ च्या अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सदर स्पर्धा विविध शालेय गटात घेतल्या जाणार आहेत. रोख रक्कम, संस्थेचे मानचिन्ह, सहभाग प्रमाण पत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. सदर स्पर्धा दिनांक २२ जानेवारी व २३ जानेवारी २०२५ रोजी पांडुरंग भवन, कालिका देवी चौकाजवळ संपन्न होणार आहेत. वक्तृत्त्व स्पर्धेचे विषय व गट या प्रमाणे - अ गट--इयत्ता १ ली ते ४थी - १) माझी आवडती सहल २) माझी ताई ३) मला आवडलेली स्वामी विवेकानंदांची गोष्ट ४) माझी शाळा ५) माझी बाग ६) माझा आवडता प्राणी ब गट- इयत्ता ५ वी ते ८ वी - १) माझा आवडता कवी २) मातृभक्त विवेकानंद ३) शिवरायांचा गनिमी कावा ४) देशभक्त भगतसिंग ५) माझा आवडता छंद ६) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पद्मभूषण कै. झाकीरभाई हुसेन क गट- इयत्ता ९ वी ते १२ वी- १) विज्ञाननिष्ठ स्वातंत्र्यवीर सावरकर २) उदंड झाले पुरस्कार ३) मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व ४) रतनजी टाटा एक आदर्श उद्योजक ५) सातासमुद्रापार स्वामी विवेकानंद ६) शिवाजी महाराज मॅनेजमेंट गुरु ७) जीवनाला आकार देणारी कला. तसेच या सोबतच सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध वेशभूषा याही स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कलासाधनाचे अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन यांच्यासह मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, अमरसिंह चव्हाण सर, अभियंता राजेंद्र माळी साहेब, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, अक्षय अनिरुद्ध बडवे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, जगदीश खडके, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, महेश अंबिके, भिमराव औसेकर, विष्णुकांत बोंबलेकर , अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे, सौ. मंदाकिनी देशपांडे, डॉ. सौ. मैत्रेयी केसकर, सौ. प्रतिभा यादव, सौ. आरती बोरखेडकर, सौ. वैष्णवी देशपांडे, सौ. गौरी देशपांडे, सागर विश्वासे सर, आदी कलासाधनाचे सदस्य विशेष प्रयत्नशील आहेत.






## पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील

# 3 मुलींची ऑल इंडिया वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत ऑल इंडिया वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेसाठी मुलींचा संघ निवडण्यात आला यामध्ये येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील तीन महिला खेळाडूंची निवड झाली आहे.

यामध्ये १. पूजा चंद्रकांत माने -(इ. सी. एस भाग-३ ),२. प्रणाली संजय बेंद्रे -(इ. सी. एस भाग-२ ),व ३. अमृता देविदास आगावणे (बी. सी. ए. भाग-२ )या महिला खेळाडूंचा समावेश आहे. या अंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धा मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, उदयपूर (राजस्थान) येथे होणार आहेत. या स्पर्धेसाठी विविध राज्यातून 110 विद्यापीठ संघ सहभाग घेणार आहेत.

या स्पर्धेसाठी आपल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा संघ सज्ज झाला आहे.

या निवड झालेल्या महिला खेळाडूंचे अभिनंदन प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. तुकाराम अनंतकवळस डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे, डॉ. उमेश साळुंखे व महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, जिमखाना विभाग सदस्य,शिक्षक कर्मचारी यांनी केले.

तसेच या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, विठ्ठल फुले, आणि मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी यांच्यासह त्यांचे मार्गदर्शक यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

ही निवड कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयासाठी खूप अभिमानाची बाब असून या खेळाडूंना विद्यापीठ पातळीवर उत्कृष्ट प्रदर्शन करण्यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

संपादकीय विशेष

# खटकणारे जातवास्तव

गेले काही दिवस बीड आणि अन्यत्र अनुभवायला मिळत असलेल्या गुन्हेगारी तसेच सामाजिक तणावाच्या घडामोडींमुळे ग्रामीण महाराष्ट्रातले जातवास्तव नव्याने प्रत्ययाला येत आहे. मध्यंतरी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये जातीचा मुद्दा नोंद घेण्याइतका डोकावून गेला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीत मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी वेगळ्या हेतूने मतदान करेल, अशी अटकळ होती. परंतु, मराठा जातीचे राजकीय शहाणपण राजकीय पक्षांमध्ये एकवटलेले असते, हेही समजून घ्यायला हवे. ते एखाद्या व्यक्तीच्या चळवळीमध्ये वा आंदोलनामध्ये कधीच एकवटलेले नसते. याचे कारण म्हणजे मराठा ही महाराष्ट्रातील सत्ताधारी जात राहिली आहे. राज्यातील राजकीय वास्तव असे आहे की, सर्वच राजकीय पक्षांच्या नेतृत्वस्थानी आणि कार्यकर्त्यांमध्ये मराठा जातीचीच बहुसंख्या असते. म्हणूनच एका व्यक्तीमुळे आपल्या सत्तास्थानांना हादरे बसत असतील तर राजकीय शहाणपण नेहमीच तडजोड, तह, समझोता वा माघार यातच असते, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळेच जरांगे पाटलांना मतदानाच्या काही दिवस आधीच माघार घ्यावी लागली होती. त्यांना उमेदवारही उभे करता आले नाहीत. परिणामत: महाराष्ट्रात अस्तित्वात असणाऱ्या दोन राष्ट्रीय आणि चार प्रादेशिक राजकीय पक्षांमध्येच मराठा जातीचे मतदान वाटले गेले. भारतीय जनता पक्षालाही मराठा जातीच्या मतदारांनी मतदान केले. त्यातूनच दिसून येणारी बाब म्हणजे भाजपाच्या आमदारांमध्ये मराठा जातीचीच बहुसंख्या आहे.

अशा सगळ्या परिस्थितीत मराठा जातीला सत्तेवरील आपला अधिकार सोडायचा नसताना ओबीसी जातींना एकवटायची संधी मिळाली आणि ती 'बटेंगे तो कटेंगे' तसेच 'एक है तो सेफ हैं'ची घोषणा बलिष्ट झाली. कारण खरे तर या दोन्ही घोषणा मुस्लिमांविरोधात नव्हत्याच. आपल्या देशाचे पंतप्रधान स्वत:ला ओबीसी म्हणवतात आणि भाजपनेही आपला डीएनए ओबीसी जातीचा आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे आता ओबीसींनी मराठा जातीकडून सत्ता हस्तगत करावी, असा संदेश योगी आणि मोदी यांनी वेगवेगळ्या घोषणांमधून दिला. अर्थातच यातून ओबीसी आणि मराठा यांच्यातील संबंध ताणले गेले. पण एकंदरच निवडणूक निकालांनंतर सत्तेत सर्वांनाच प्रतिनिधित्व मिळाल्याचे लक्षात आले आहे. सत्तेसाठी सगळे भांडण असताना सत्तेचे वाटप आणि पुनर्वाटप योग्य प्रमाणात होण्याची काळजी नवे सत्ताधारी घेत आहेतच. त्यामुळे यापुढे जातीपातीतील तणाव उफाळून येणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. बीडमधील संघटीत गुन्हेगारीचे ताजे स्वरुप समोर आल्यानंतर राजकीय शहाणपण सामाजिक सलोख्यामध्ये उतरणे गरजेचे वाटते.

दहा वर्षांपूर्वी सत्ता हस्तगत केली, तेव्हा फडणवीस यांच्यामागे आमदारांचे बहुमत नव्हते. तेव्हा एकनाथ खडसे यांचे नाव अग्रस्थानी होते. म्हणजेच तेव्हा ओबीसींना सत्ता अपेक्षित होती. पण फडणवीसांनी ती हस्तगत केली आणि नंतर आपल्याला आडवे येण्याची शक्यता असणारे नेते पटावरुन हळूहळू वगळायला सुरूवात केली. मग त्यात मराठा आणि ओबीसी असे दोन्ही जातीचे नेते होते. त्यामुळे फडणवीसांमुळे महाराष्ट्रात ब्राह्मण विरुद्ध अन्य जाती असा संघर्ष उद्भवला. एखाद्याला तिकीट मिळू द्यायचे नाही, एखाद्याला मंत्रिमंडळातून वगळायचे, एखाद्यावर चौकशी लावायची तर एखाद्यावर गुन्हेगारीचे दावे उभे करायचे यासारखे अनेक प्रकार राज्याने 2019 नंतर पाहिले. थोडक्यात, ब्राह्मण जातीचे असणारे फडणवीस अतिशय मुत्सद्दी नेता असल्याचे चित्र निर्माण झाले आणि जरांगे पाटलांच्या तोंडून वारंवार तेच व्यक्त होत राहिले. पुढे फडणवीसांनी मराठा आरक्षणाबाबतच्या अपयशाचे खापर उद्धव ठाकरे यांच्यावर फोडले खरे, पण मराठा जातीला सामाजिकदृष्ट्या मागास ठरवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा येऊ घातलेला निकाल आता कसा असेल हे सांगता येत नाही. याआधी एकदा त्यांनी या जातीला मागास ठरवलेले नाही. म्हणजेच आरक्षणाचे निकष लागू पडत नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी मराठा समाजाला सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर यापुढील काळात सामाजिक सलोखा जपताना आणि मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याकामी फडणवीस यांचे राजकीय कौशल्य पणाला लागणार आहे. ते लागेपर्यंत ग्रामीण भागात जातकारण समाजाची वीण उसवणार नाही, हे पहावे लागणार आहे. आज ग्रामीण भागात या अनुषंगाने सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याचे आणि कायम राखण्याचे आव्हान समोर असणार आहे.



1930 ते 1980 या कालखंडादरम्यान काँग्रेसने मनुवादविरोधी, ब्राह्मणवादविरोधी बहुजनांना एकत्रित करुन मराठ्यांचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, भाजपाने सातत्याने हे मराठ्यांचे राज्य असल्याचे लोकांच्या मनावर बबवण्याचा प्रयत्न केला. पुढे मंडल आयोग लागू झाल्यानंतर मात्र बीजेपीने ओबीसींच्या अस्मितेचे राजकारण तीव्रतेने पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू केला. अलिकडच्या काळात बऱ्याचशा लोकांना भाजपची 'बटेंगे तो कटेंगे' ही घोषणा हदू-मुस्लिम संबंधातली वाटली. पण प्रत्यक्षात ती ओबीसींना एकत्र आणणे आणि हदू म्हणून लोकांना एकत्र करण्याची मानसिकता निर्देशित करत होती. महाविकास आघाडीने सामाजिक न्यायावर भर देणारी भूमिका घेतली होती. पण ती भाजपाच्या पचनी पडणारी नव्हती. कारण यात दोन अडचणी आहेत. एक म्हणजे यामुळे राखीव जागा मिळवणाऱ्या प्रमुख जातींची अडचण निर्माण होते. मायावती, प्रकाश आंबेडकर यांचा उपवर्गीकरणाला विरोध आहे. भाजपाने मात्र या निवडणुकीमध्ये छोट्या जातींना मोठ्या प्रमाणावर संघटित केले आणि मोठी आश्वासने दिली. हे राज्यातले नवे जातकारण आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या मागील मुख्यमंत्रीपदाच्या कालखंडात संघाचे शताब्दी वर्ष दूर होते. मात्र आता संघाची शताब्दी सुरू झाली आहे. अशा काळात वेळ दवडता कामा नये, शक्य ते प्राप्त करुन घ्या; हा विचार बळावण्याची दाट शक्यता आहे. त्यातच संघ फडणवीस यांच्या मागे ठामपणे उभा आहेच. तेव्हा फडणवीस, संघ आणि एकंदर हदुत्ववादी मतदार एकत्र आले तर दोन मराठा उपमुख्यमंत्री आपली सामाजिक वारशाची परंपरा कशी पुढे नेतील हेदेखील आता बघावे लागेल. कारण यातील एक बाळासाहेब ठाकरे यांना मानतो तर दुसरा फुले-शाहू-आंबेडकर यांना मानतो. असे असताना ते आपली परंपरा कशी जपतील, जातकारणाचा तिढा कसा सोडवतील हे येता काळ दाखवून देईल.

# नवे वर्ष नव्या अपेक्षा

**मागील वर्षापेक्षा नवीन वर्षामध्ये आयुष्याला स्पर्शणाऱ्या विविध क्षेत्रांमध्ये वेगळे चित्र पहायला मिळेल याची शाश्वती नाही, पण अपेक्षा खूप आहेत. २०२४ मधील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचा, आणि भविष्यातील भाकितांचा येत्या वर्षावर दरवर्षीप्रमाणे प्रभाव असेल हे निश्चित. मात्र विविध क्षेत्रांसाठी हे वर्ष कसे राहील, याचा आढावा बोलका आहे.**

वर्तमान

शंतनु चिंचाळकर

अखेर नव्या अपेक्षांनिशी नवे वर्ष अवतरले आहे. या वर्षात जाणवणाऱ्या नानाविध आव्हानांची, घडामोडींची चर्चा एव्हाना सुरु झाली आहे. सहाजिकच २०२५ मध्ये महागाई, बेरोजगारी, अर्थकारण, शैक्षणिक विश्व, माहिती तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय संबंध, कृषीविषयक समस्या आदी पातळ्यांवर काय काय घडणार, हे जाणून घेणे महत्वाचे आहे. या महत्वाच्या आव्हानांबरोबरच मथुरा, श्रीकृष्ण जन्मभूमी आणि ज्ञानवापी मस्जिद सारखे इतरही सामाजिक विषय काय वळण घेतात, हे पाहणे महत्वाचे आहे. सर्वप्रथम राजकीय चौकटीतून आढावा घेऊ. केंद्रातले सरकार सध्या हिंदुत्ववादी नसलेल्या दोन महत्वाच्या पक्षांच्या आधारावर सत्तेत आहे. त्यामुळे एकीकडे हिंदुत्ववादी संघटनांचा दबाव तर दुसरीकडे पाठिंबा देणाऱ्यांना सांभाळणे, हे आव्हान म्हणजे केंद्र सरकारची तारेवरची कसरत असेल. राज्य सरकारांचा विचार करता लाडकी बहिण वा तत्सम महिलाकेंद्री योजना वाढीव मदतीद्वारे सुरू ठेवणे आणि विविध जातींचा, समुदायांचा आरक्षणाचा आग्रह समजून घेणे, हा एक महत्वाचा मुद्दा असेल.

'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयक मंजूर करून घ्यायला पूर्ण बहुमत नसलेल्या केंद्र सरकारला अशाच दिव्याला सामोरे जावे लागणार आहे. बड्या विरोधी पक्षांचा या विधेयकाला तीव्र विरोध आहे. 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ'हे तत्व अंगीकारून सात वर्षे उलटून गेली तरी जीएसटीबाबत काही तक्रारी आहेत. करदात्यांसह करनियोजन करणाऱ्यांना सोपी जाईल, अशी कार्यप्रणाली राबवण्याचे आव्हान केंद्र सरकारला पेलावे लागणार आहे. महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी वर्गाचे प्रश्न दर वर्षीसारखेच प्रलंबित आहेत. २०२५ च्या सुरुवातीलाच दिल्लीमध्ये होऊ घातलेल्या निवडणुकीच्या तोंडावर असे प्रश्न महत्वाचे ठरणार आहेत.

2024 च्या उत्तरार्धात पार पडलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीनंतर ट्रम्प सरकार सत्तेत आले. ज्यांच्यामुळे कोणत्याही क्षणी महायुध्दाच्या भडका उडू शकतो, अशा रशिया-युक्रेन आणि इस्रायल-आखाती देशातील युध्दांना त्यामुळे फारसा काही फरक पडेल असे आता दिसत नाही. कारण, रशिया आणि इस्रायल ही अमेरिकेच्या दबावापुढे झुकणारी राष्ट्रे नव्हेत. इस्रायलला अमेरिकेचा तर युक्रेनला पाश्चात्य देशांचा छुपा पाठिंबा आहे. त्यामुळे या युध्दांपासून दूर राहून आपले राजकीय महत्व कायम ठेवण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असेल. भारत-चीन सीमावाद हा तात्पुरता थंड होणारा आणि कधीही गंभीर होणारा मुद्दा २०२५ लाही 'पुनश्च: हरी ओम' म्हणत पुढे चालूच राहील अशी चिन्हे आहेत. ३७० वे कलम रद्द करून केंद्र सरकारकडून काश्मीर प्रश्न आणि दहशतवादावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याचे प्रयत्न केले गेले. पुढील काळात विभाजनवादी शक्तींना होणाऱ्या देशांतर्गत अर्थ आणि मनुष्यबळ पुरवठ्यावर बऱ्याच अंशी अंकुश ठेवण्यात केंद्र सरकार यशस्वी ठरेल, अशी आशा आहे.

५ जून २०२४ रोजी नासाच्या अंतराळ मोहिमेवर गेल्यावर फ्लाइटमधील हेलियम गळती आणि थ्रस्टर निकामी झाल्यामुळे अंतराळात अडकलेल्या भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स यांच्या पृथ्वीतलावर परत आणण्याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. यापूर्वी १९ नोव्हेंबर १९९७ रोजी अंतराळ मोहिमेवर गेलेल्या कल्पना चावला यांचा 1 फेब्रुवारी 2003 रोजी पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना झालेल्या अंतराळयान अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवर ही मोहीम महत्वाची असेल. दरम्यान, यंदा महिला अंतराळवीराचे पहिल्यांदाच चंद्रावर पाऊल पडणार आहे. अमेरिकेच्या 'नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन' (नासा) या संस्थेने नव्या अंतराळ मोहिमेची तयारी सुरू केली आहे. ही मोहीम जगाच्या दृष्टीने औत्सुक्याची आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केलेला अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये शाश्वत कृषी परिसंस्था जोपासण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम प्रस्तावित केले. पीक विम्यामध्ये हस्तक्षेप, नॅनो खतांच्या वापराला प्रोत्साहन, तेलबिया उत्पादनात स्वयंपूर्णतेला चालना देणे आणि सूक्ष्म अन्न प्रक्रियेतील गुंतवणूक वाढवून कृषी क्षेत्रातील उत्पादकतेला समर्थन देणे हे केंद्र सरकारचे उद्दिष्ट्य आहे. याबाबत या वर्षामध्ये राज्य सरकारलाही महत्वाची भूमिका पार पाडावी लागेल. भारतीय तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. २०२४ हे वर्ष क्लाउड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा आणि शाश्वत तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे गाजले. २०२५ मध्ये भारतीय तंत्रज्ञानाचा लॅंडस्केप विकसित होत आहे, कारण व्यवसाय स्पर्धात्मक राहण्यासाठी तंत्रज्ञानाशी जुळवून घ्यावे लागेल. संस्था समाकलित करून, बहु-क्लाउड रणनीतींचा अवलंब करून आणि सायबर सुरक्षेला प्राधान्य देऊन लवचिक आणि नाविन्यपूर्ण इकोसिस्टीम तयार केली जात आहे. एआय आणि मशीन लर्निंग इंटिग्रेशन प्रोग्राम मशीन लर्निंग ऑपरेशन्सचा अविभाज्य घटक बनत आहेत. २०२५ मध्ये व्यवसायांनी निर्णय घेण्याची क्षमता वाढवण्यासाठी, पुनरावृत्ती होणारी कार्ये स्वयंचलित करण्यासाठी आणि वैयक्तिकृत ग्राहक अनुभव प्रदान करण्यासाठी नवे उपाय स्वीकारणे अपेक्षित आहे. उत्पादन, आणि वित्त यांची उद्योगपुरवठा साखळी उत्तम प्रकारे वापरण्यासाठी, जोखीम व्यवस्थापन करण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी भविष्यसूचक विश्लेषणे आणि एआयचालित अंतर्दृष्टीचा फायदा घेण्यावर नव्या वर्षात उद्योगक्षेत्राचा भर असायला हवा.

शिक्षण प्रक्रियेतील तंत्रज्ञान अधिक समावेशक आणि परिणामाभिमुख बनवण्याचे उद्दिष्ट २०२५ मध्ये समोर असणार आहे. डिजिटल क्लासरूमपासून ऑनलाइन संसाधनांपर्यंत, शहरी-ग्रामीण भेद दूर करण्यासाठी तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण महत्त्वाचे आहे. त्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळेल. हे नवीन शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे जुळते. आकर्षक शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी उच्च तंत्रज्ञान वापरण्यावर २०२५ मध्ये जोर दिला जाणे अपेक्षित आहे. या शैक्षणिक परिवर्तनाला पाठिंबा देण्यासाठी सायबर स्कूल व्यवस्थापनाद्वारे येत्या वर्षात प्रयत्न होणे अपेक्षित आहे. शाळा व्यवस्थापन सॉफ्टवेअर २०२५ चे नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी शाळांना मदत होईल अशा प्रकारे डिझाइन केलेले आहे. शिक्षक शिक्षण सुलभ करण्यासाठी, विविध कार्ये आणि प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी या सोफ्टवेअरचा वापर करू शकतात. ते व्यावहारिक आणि वास्तविक प्रयोगांवर आधारित धोरणे संरेखित करतात. सायबर स्कूल मॅनेजर शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि शिक्षणाच्या या नवीन युगात विद्यार्थ्यांचा शिकण्याचा अनुभव उन्नत करण्यासाठी येत्या वर्षात प्रयत्नशील राहतील. वाढत्या बेरोजगारीच्या समस्येबरोबर २०२५ मध्ये जाताना टाळेबंदी, महागाई या अनुषंगाने तरुणांमध्ये अनिश्चितता आणि अस्थिरता दिसून येते. परिस्थितीशी जुळवून घेण्यास आणि विकसित होण्यास इच्छुक असलेल्यांसाठी आव्हाने आणि संधीदेखील निर्विवाद आहेत. मार्केट ट्रेंड समजून घेऊन, धोरणात्मक तयारी करून नोकरी शोधणारे नव्या वर्षात यश मिळवू शकतात.

माहिती तंत्रज्ञान आणि नवीन तंत्रज्ञान ही २०२५ मधील अतिशय महत्त्वाची क्षेत्रे असतील. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग यामुळे अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. काही नोकऱ्या व्यापार, विज्ञान, राजकारण, किंवा पर्यावरणाशी थेट निगडीत आहेत. त्या अपारंपारिक ऊर्जेचा विकास, उर्जेचे नवीन स्रोत, बॅटरी, तसेच लुप्त झालेल्या प्रजातींचे संवर्धन, बिझनेस सल्लागार किंवा कायदेशीर सल्ला तसेच पर्यावरण संरक्षण कायदे या क्षेत्रात निर्माण होऊ शकतात. जागतिक पातळीवरील लोकसंख्या आता वृद्धावस्थेत पोहोचली आहे तसेच आयुमर्यादाही वाढली आहे. त्यामुळे त्यांची काळजी घेण्याची आणि उपचारांची गरज लागणार आहे. त्यामुळे आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना पुढच्या काळात मागणी असणार आहे. आरोग्यसेवक फक्त औषधेच नाही तर नैतिक आधार देतील, हे ही पहावे लागणार आहे.

मेकॅनिक, रिपेअरमन, इलेक्ट्रिशियन, बिल्डर यांचीही गरज येत्या काळात भासणार आहे. वेगवेगळ्या परिस्थितीत किरकोळ किंवा कौशल्यपूर्ण कामे करायची असल्यास माणसांना पर्याय नाही. मात्र मागणी कायम रहावी यासाठी या लोकांनाही आपले ज्ञान सतत अपडेट करावे लागेल आणि नवीन गोष्टी शिकाव्या लागतील. ग्राहक सेवा (कॅशिअर, विक्रेते, सल्लागार इत्यादी), कार्यालय व्यवस्थापन (रिमोट वर्किंग वाढल्यामुळे), डेटा एंट्री (अर्थ, आकडेवारी, टायपिस्ट, टेक्निकल ट्रान्सलेटर), अकाऊंटिंग आणि एकच काम वारंवार करणारे फॅक्टरी वर्कर्स यांचा त्यात समावेश असेल. ही गरज या वर्षात अधोरेखीत होईल.

एकूणच २०२५ कडून अपेक्षा खूप आहेत. सलग तीन वर्षे कोविडसारख्या महामारीशी, वाढत्या महागाईशी आणि सामान्यांच्या समस्यांशी अव्याहतपणे दोन हात केल्यावर समाजातील विविध वर्गांसाठी यंदा जगभर आशादायक परिस्थिती निर्माण होण्याची आशा आहे.

खेचाखेची

## टोपी कुठे?

एकदा एक लहान मुलगा विहिरीत बुडताना जवळपासच्या लोकांनी पाहिलं. त्यातील एकाने विहिरीत उडी घेतली आणि त्या मुलाला वर काढलं. इतक्यात त्या मुलाची आई तिथं आली आणि 'याला विहिरीतून कोणी वर काढलं', असं विचारू लागली.

त्यावर प्रशंसा होईल आणि बक्षीस मिळेल या आशेने तो माणूस पुढे आला. तेव्हा त्या बाईने विचारलं, 'तुम्ही याला पाण्यातून वर काढलं ना, मग याची टोपी कुठे आहे?'

सुप्रभात

वेगळे काही

जपानमधील यामाटो नावाचा हा खोडकर मुलगा चांगलाच चर्चेत आला. यामाटो प्रचंड मस्तीखोर... त्याच्या 'कृष्णलीला' दिवसेंदिवस हाताबाहेर जात होत्या. समजावून, शिक्षा करूनही काही फरक पडत नव्हता. शेवटी यामाटोच्या आई–वडिलांनी त्याला जबरी शिक्षा देण्याचं ठरवलं आणि अस्वलांचं वास्तव्य असणाऱ्या जंगलात त्याला एकटं सोडून देण्यात आलं. सोडल्यानंतर काही वेळातच ते पुन्हा जंगलात पोहोचले. मात्र अल्प कालावधीत यामाटो जंगलात दिसेनासा झाला. सात दिवसानंतर तो सैन्यातील जवानांना सापडला. त्याच्या शरीरावर कोणत्याही जखमा नव्हत्या. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून यामाटोला तात्काळ रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं.


## वापरा ट्रेंडी बॉटम्स

स्टाईल स्टेटमेंट



मैत्रिणींनो, सध्या विविध प्रकारच्या बॉटम्सचा ट्रेंड आहे. एकापेक्षा एक हटके बॉटम्स खूप छान दिसतात. यामुळे एकच कुर्ती वेगवेगळ्या स्टाईलने कॅरी करता येते. ऑफिस असो किंवा लग्न समारंभ, या ट्रेंडी बॉटम्स तुम्ही कुठेही कॅरी करू शकता. कुर्तीवर घालता येण्यासारखे बॉटम्सचे विविध पर्याय...

✻ सध्या धोती पॅंटची क्रेझ आहे. कुर्तीला साजेशी धोती पॅंट शिवून घेता येईल. तयार धोती पॅंटचा पर्यायही आहे. या पॅंटवर लॉंग किंवा शॉर्ट कुर्ती घालता येईल. यावर अनारकली स्टाईल शॉर्ट कुर्ती खूप छान दिसेल. ✻ ट्राउजर स्टाईल पॅंटचा ऑप्शनही आहे. अशा पॅंटमध्ये तुम्हाला खूप आरामदायी वाटतं. आपली आवड आणि कंफर्टचा विचार करून ट्राउजर पॅंट शिवून घेता येतील. ✻ स्टायलिश आणि ट्रॅडिशनल लूकसाठी कुर्तीसोबत शरारा घालता येईल. यावर लॉंग किंवा शॉर्ट यापैकी कोणतीही कुर्ती घालता येईल. ✻ पलाझोचा ट्रेंडही जोरात आहे. डिझायनर कुर्त्यावर प्लेन पलाझो घालता येईल. फॉर्मलवेअर म्हणून पलाझो आणि कुर्ती कॅरी करता येईल.




राशीभविष्य

- **मेष** : संकल्पपूर्तीसाठी अनुभवींचा सल्ला घ्या. ओळखी लाभदायक ठरतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृषभ** : आर्थिक निर्णय घाईगडबडीत घेऊ नका. विरोधकांच्या कारवायांबाबत सावध रहावं. संयम बाळगावा.
- **मिथुन** : मतभेद वा गैरसमज दूर होतील. गुंतवणुकीचा विचार तुर्तास दूर ठेवा. आर्थिक स्थिती बरी राहील.
- **कर्क** : कौटुंबिक बाबतीत मनस्ताप संभवतो. जबाबदाऱ्या योग्य रितीनं पूर्ण कराव्या. प्रवास शक्यतो टाळा.
- **सिंह** : कामातील सातत्य गरजेचे ठरेल. उत्साहवर्धक घटना घडतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **कन्या** : प्रलंबित कामांना गती येईल. मोठ्या व्यवहारात तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **तूळ** : उत्साह राहील. मित्रमंडळीत आर्थिक व्यवहार टाळावेत. पित्ताच्या विकारात काळजी घ्या.
- **वृश्चिक** : कौटुंबिक मतभेद त्रासदायक ठरतील. गुंतवणुकीत अनुकूलता राहील. थोरामोठ्यांचा सल्ला घ्यावा.
- **धनु** : कोणावर टीका करणं टाळावं. वेळ आणि कामाचं योग्य नियोजन करावं. विद्यार्थ्यांना सुयश लाभेल.
- **मकर** : आत्मविश्वासपूर्वक वाटचाल सुरू राहील. कार्यक्षेत्रात नवीन जबाबदाऱ्या येतील. बाकी चिंता नको.
- **कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. नव्या कामांबाबत उत्साह राहील. स्थावर बाबतीत दिलासा मिळेल.
- **मीन** : मनाजोग्या संधी प्राप्त होतील. व्यक्तिगत बाबतीत कमी बोलावं. प्रियजनांचा सहवास लाभणार आहे.

सल्ला मोलाचा

## असेही उपयोग

अन्न गरम आणि ताजं राहावं यासाठी अॅल्युमिनिअम फॉईलचा वापर केला जातो. पण या फॉईलचे इतरही अनेक उपयोग आहेत. याबद्दलची माहिती अनेकदा कामी येऊ शकते. स रंगवताना चष्म्याच्या काड्यांनाही रंग लागतो. या काड्यांवर अॅल्युमिनिअम फॉईल गुंडाळून ठेवता येईल. ✻ बॅग ओलसर होऊ नये यासाठी त्यात फॉईल पसरून ठेवता येईल. ✻ रंगकाम करताना दरवाज्याच्या हॅंडलना फॉईल गुंडाळून ठेवल्याने रंगाचे डाग पडणार नाहीत. ✻ अंधारात फोटो काढण्यासाठी रिफ्लेक्टर्सचा वापर केला जातो. त्याऐवजी अॅल्युमिनिअम फॉईलचा वापर करता येईल पुठ्ठ्यावर ही फॉईल चिकटवून रिफ्लेक्टरप्रमाणे वापरा. ✻ घरी बार्बेक्यू करताय? त्यावर चिकटून बसलेले अन्नकण काढून टाकणं वैतागवाणं असतं. पण अॅल्युमिनिअम फॉईलने हे कण सहज काढता येतात आणि बार्बेक्यू ग्रील स्वच्छ होतं. ✻ कपड्यांना इस्त्री करताना इस्त्रीखाली फॉईल पसरून ठेवा. इस्त्री लवकर होईल. अॅल्युमिनिअम फॉईल उष्णता परावर्तित करत असल्याने वेळ वाचतो. ✻ अॅल्युमिनिअम फॉईल घासल्याने कात्री किंवा सुरीला धार लाभू शकते.

## १८ जानेवारी

दिनविशेष

- **१९६७** : क्रांतिकारक, कृषीतज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचं निधन.
- **२०१३** : वाहतुकीला अडथळा आणणारा कोणताही पुतळा उभारण्याची अथवा बांधकामाची परवानगी न देण्याचे केंद्राचे राज्य सरकारांना निर्देश.
- **२०१४** : ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर यांची 'द वर्ल्ड पोस्ट' या ऑनलाइन संकेतस्थळाच्या संपादकीय मंडळावर नियुक्ती.
- **२०१५** : अन्नसुरक्षा अभियानात सरसकट सर्व कुटुंबांचा समावेश करण्याचा आघाडी सरकारचा निर्णय भाजप सरकारनं रद्द केला.

महत्त्वपूर्ण काही...

## आता अंतराळात वसाहत

अंतराळात वसाहत उभी करणं हे सोपं काम नसलं तरी अशक्यप्रायही नाही. विशेषत: सध्याच्या प्रगत, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या जमान्यात हा प्रयोग प्रत्यक्षात आणणं शक्य होणार आहे. मुख्यत्वे अंतराळात गुरूत्वाकर्ष जवळजवळ नसल्यातच जमा असतं. त्यामुळे वसाहतीसाठी सिमेंटचे भव्य प्रासाद बांधणं शक्य होणारं नाही. त्यामुळे अंतराळात सोयीच्या ठरतील अशा इमारतींच्या उभारणीसाठी नवं तंत्रज्ञान वा नवं शास्त्र वापरलं जाणार आहे. शिवाय गुरूत्वाकर्षणाचा अभाव लक्षात घेऊन द्रवपदार्थांबाबत काय करता येईल, विशेषत: दोन द्रव्यांचं मिश्रण अधांतरी करता येईल का, या प्रश्नांचा अभ्यास केला जात आहे. त्याच बरोबर गुरूत्वाकर्षण विरहित अवस्थेबाबत काही प्रयोगही करता येण्यासारखे आहेत. एकूण अंतराळातील वसाहत हे आता स्वप्न राहिलं नसून तो विज्ञान–तंत्रज्ञानाच्या विकासातील संभाव्य टप्पा म्हणून याकडे पाहिलं जात आहे. मुख्यत्वे गुरूत्वाकर्षणामुळे जे प्रयोग वा प्रकल्प पृथ्वीवर राबवणं शक्य होत नाही, ते अंतराळातील वसाहतींमध्ये राबवणं शक्य होईल. हा लाभही लक्षात घेण्यासारखा आहे.

पंचांग

**शनिवार, १८ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. ५, नक्षत्र : पू. फाल्गुनी
चंद्रराशी : सिंह , शोभन योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२२

फॉरवर्डस

आयुष्यात कसोटी बघणारे क्षणच आपल्याला कणखर बनवतात...

**होसलों का सबूत देना था, इसलिए ठोकरे खा कर भी मुस्कुरा गए...**

आरोग्यमंत्र

## सफरचंदाचे लाभ

सफरचंदाचे आरोग्यदृष्ट्या होणाऱ्या लाभाविषयी बोललं वा लिहिलं जातं. रोज एक सफरचंद नियमितपणे खाल्ल्यास विविध विकारांना दूर ठेवता येतं, असाही दावा केला जातो. अर्थात, सफरचंद खाल्ल्याने अनेक लाभ मिळतात. मात्र, या लाभांविषयी नेमकी माहिती असणं गरजेचं ठरतं. त्यामुळे आवर्जून सफरचंदाच्या सेवनावर भर दिला जाऊ शकतो. चला तर मग सफरचंदाच्या काही प्रमुख लाभांविषयी जाणून घेऊ..



✻ आपल्या शरीरातले मुक्त कण मेंदूच्या पेशींचं नुकसान करतात. यामुळे मेंदूभोवती असलेल्या आवरणाला म्हणजेच न्यूरॉन्सला इजा पोहाचते. पण सफरचंदाच्या सेवनाने मेंदूचा बचाव होतो. मेंदूला सूज आल्याने आपली स्मरणशक्ती क्षीण होते. पण यातल्या क्यूर्सेटीन नामक अँटीऑक्सिडंटमुळे मेंदूला सूज येत नाही आणि स्मरणशक्ती कमकुवत होत नाही. तसंच मेंदूला ज्या पोषणमूल्यांची गरज असते ती मेंदूपर्यंत पोहोचवण्यास हे अँटीऑक्सिडंट मदत करतं. ✻ मेंदूच्या अनेक आजारांवर सफरचंद उपयुक्त आहे. सध्या डिमेन्शिया, अल्झायमरचं प्रमाण वाढतंय. रोजच्या आहारात सफरचंदाचा समावेश केला तर या विकारांचा धोका कमी होतो. ✻ दररोज सफरचंदाचा रस पिण्याचेही अनेक फायदे आहेत. सफरचंदाच्या रसामुळे अॅसीटीलकोलीन नावाच्या रसायनाची मात्रा वाढते आणि मेंदूची क्षमता आणि स्मरणशक्ती वाढण्यास मोलाची मदत होते.

वाचा तर खरं

सोफा हे हॉलचं सेंटर ऑफ अॅट्रेक्शन असतं. सोफ्यावरील कुशन्स ट्रेंडी असल्या तर हा नखरा अधिकच वाढतो. बाजारात वैविध्यपूर्ण डिझाईन्सच्या कुशन्स मिळतातच पण तुम्हीही कल्पनाशक्ती लढवून कुशन्स सजवू शकता. क्रीमी सोफा असेल तर पॅरेट ग्रीन, ब्लू किंवा पिंक कुशन्स निवडू शकता. सोफा डार्क असेल तर लाईट कलरच्या कुशन्स निवडता येतील. या कुशन्सवर फॅब्रिक कलरने पेंट करता येईल. कुशन्सच्या कडा अथवा मध्यात फ्लॉवर प्रिंट करु शकता. वेगवेगळ्या रंगाच्या कुशन्सचं कॉम्बिनेशनही छान दिसतं.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

Selected

## राजगुरू महाविद्यालयात पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न



**खेड :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने नवीन पाककलेचा शोध घेणे, कृतीवर आधारित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने आयोजित भव्य पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यात १४५ विद्यार्थिनींनी नाविन्यपूर्ण व स्वादिष्ट पदार्थ बनवले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक मराठमोळ्या पाककृतींपासून फ्युजन डिशपर्यंतच्या पदार्थ बनवले. पाककला स्पर्धा गोड, पारंपरिक व नाविन्यपूर्ण थाळी अशा तीन प्रकारात घेण्यात आली. गोड थाळीत प्रथम क्रमांक सिद्धी बोंबले (केक), द्वितीय क्रमांक नियती आंध्रे (लापशी), प्रणाली गोसावी (गुलाबजाम) तृतीय क्रमांक अनुजा महाजन व समृद्धी थिटे (शाही तुकडा) यांचा आला. तर पारंपरिक थाळीत प्रथम क्रमांक ढवळे सिद्धी (मासवडी), द्वितीय क्रमांक सुहानी राक्षे (पाटवडी) तृतीय क्रमांक तनिष्का नेहरे (बासुंदी) व विद्या शिर्के (छोले भटूरे) यांचा आला. नाविन्यपूर्ण थाळीमध्ये प्रथम क्रमांक साक्षी लांडगे (काळ्या तांदळाची खीर), द्वितीय क्रमांक कदम सुजाता (मसाला पापड) व तृतीय क्रमांक पायल कोतवाल- (मॅगी पोहे) व सिद्धी पोखरकर (दहिवडा) यांनी पटकावला. परीक्षकांनी पदार्थांची चव, मांडणी आणि घटकांचा वापर यावर आधारित मूल्यमापन केले. स्पर्धेचे आयोजन प्रा. तृप्ती हाडके, प्रा. उषा जाधव, प्रा देविनी साबळे यांनी केले.

## महात्मा गांधी विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात



**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथील महात्मा गांधी विद्यालयात राज्य क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऑलम्पिकवीर महान कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांचा जन्मदिन महाराष्ट्र शासनातर्फे राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात ऑलिंपिक वीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पुजन विद्यालयाचे प्राचार्य अर्जुन कोकरे, पर्यवेक्षक संजय पवार व सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनी केले. तसेच याप्रसंगी विद्यालयातील कुस्तीपटूंचे पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. क्रीडादिनानिमित्त विद्यालयामध्ये कबड्डी व धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उदघाट्न विद्यालयातील कुस्तीपटू आर्यन शिंदे, यश भोसले, ओम जगदाळे, सोहम लकडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. उपशिक्षक संजय माळी यांनी आभार मानले.

## वळतीत शेतकरी बाबा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम



**रांजणी :** वळती (ता. आंबेगाव) येथे शेतकरी बाबा उत्सव गुरुवारी (दि. १६ ) उत्साहात संपन्न झाला. यानिमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वळती गावातील मालजे वस्ती मधील शेतकरी कुटुंबे एकत्र येऊन शेतकरी बाबांचा उत्सव साजरा करतात. यंदाचे हे ४५ वे वर्ष आहे. सकाळी शेतकरी बाबांच्या मूर्तीची पुजा व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर शेरणी व मांडव डहाळ्यांची गावातून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत कलशधारी महिलांनी शोभा आणली. दुपारी महाआरती घेण्यात आली. त्यानंतर सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. महिलांचा हळदी कुंकवाचा समारंभ संपन्न झाला. यावेळी मालजेवस्ती वळती परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रात्री शाहीर नरहरी शिंदे आणि पार्टीचा गाण्यांचा बहारदार कार्यक्रम झाला.

## नरसिंह विद्यालयात २४ वर्षानंतर भरला दहावीचा वर्ग



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** रांजणी (ता. आंबेगाव) येथील रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालयामध्ये २००१ साली शिक्षण घेत असलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा पुन्हा तब्बल २४ वर्षानंतर वर्ग भरला. यावेळी सर्व मित्र मैत्रिणी उपस्थित होते. २४ वर्षांपूर्वी एकत्र शिक्षण घेत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा वर्ग भरला, अशी भावना उपस्थितांची झाली होती. चाळीशी जवळ आलेल्या विद्यार्थ्यांनी त्याकाळी बाकांवरच्या मित्र-मैत्रिणीसोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देताना शाळेतल्या गमतीजमती सांगत जुन्या आठवणीत रमले होते. तसेच समाजात वावरताना एकमेकांना आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली.

स्नेहसंमेलनाचे आयोजन संदीप दगडू वाघ विकास वाघ व शेखर ओहळ यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेप्रमाणे नियमित परिपाठ पार पडला. मूल्य शिक्षणाचे महत्त्व त्याप्रसंगी सांगितले गेले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची ओळख व त्यांचे सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आले. त्यानंतर प्रमिला गवारी, सोनाली शिंदे, विशाल वाघ, किरण अजाब, शाम टेमगिरे, दत्तात्रय गायकवाड, छाया वायकर, सिमा औटी, छाया गुंजाळ, सारिका हिरे, सुनिल खुडे, डॉ सुहासिनी भोईटे, डॉ प्रशांत कुंभार, अमोल भोर, शेखर ओहोळ, समिर थिटे, अजय वाघ, डॉ शशिकांत सोनवणे, विकास वाघ, अजित सोनवणे, सारिका शेवाळे व अनिल भोर यांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

# नगरपरिषद अधिकाऱ्यांना 'घेराव'

## मनमानी कारभाराविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



खेड राजगुरुनगर नगरपरिषदेचे अधिकारी राहुल लामखडे यांना निवेदन देताना शहरातील नागरिक.

**खेड :** नागरिकांना सेवा, सुविधा देण्यात कमी आणि वसुलीची मात्र हमी अशी राजगुरुनगर नगरपरिषदेची प्रतिमा बनली आहे. यात लवकरात लवकर बदल झाला नाही तर ही क्रांतिकारकांची भुमी असुन भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शहरातील संतप्त नागरिकांनी गुरुवारी (दि १६) नगरपरिषद कार्यालयात एकत्र येऊन दिला.

राजगुरुनगर शहरात नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. मात्र, त्याकडे नगरपरिषद प्रशासनाचे पुर्णतः दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.शहरात नव्याने झालेले रस्ते, त्याची लगोलग खोदाई, पिण्याचा पाणी पुरवठा,कचरा व्यवस्थापन, अवाजवी मिळकत कर आकारणी आदी प्रश्न उपस्थित करून नागरिकां कडून नगरपरिषदेच्या कारभारावर टीका टिपण्णी होत आहे.या पार्श्वभूमीवर खेड पंचायत समितीचे माजी सभापती अंकुश राक्षे, माजी नगरसेवक शंकर राक्षे, शिवसेनेचे शहराध्यक्ष दिलीप तापकीर, राजगुरुनगर वकील बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अनिल राक्षे, ॲड दीपक थिगळे आदींच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नगरपरिषद कार्यालयात एकत्र येऊन भेट दिली.अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.कार्यालय अधीक्षक राहुल लामखडे यांनी आक्रमक युवकांचे म्हणणे ऐकुन घेत निवेदन स्वीकारले. मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील नागरिकांची समस्यांसंदर्भात लवकरच संयुक्त बैठक आयोजित केली जाईल असे त्यांनी सांगितले.

राजगुरुनगर नगरपरिषदेने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून मिळकत धारकांना नव्याने लागू केलेल्या करवाढीतील काही बाबी बेकायदेशीर व नागरिकांचे दृष्टिकोनातून अन्यायकारक आहेत. करवाढीच्या नावाखाली संपूर्ण राजगुरुनगर मधील नागरिकांना अक्षरशा लुटले जात आहे. चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या वसुली प्रणालीत तात्काळ बदल करावा. यामध्ये थकबाकी दाखवुन वार्षिक २४ टक्के दराने वसुली होत आहे.ती कायमस्वरूपी बंद करण्यात यावी. सन २०२३-२४ वर्षाच्या आधीचा कर रद्द करावा. अन्यथा काही दिवसात आम्ही आंदोलन करू असे यावेळी सांगण्यात आले.

## नरसिंह विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धेत यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** रांजणी (ता. आंबेगाव ) येथील रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालय ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स, रांजणी भागशाळा वळती, मांजरवाडी येथील विद्यार्थ्यांनी शासकीय चित्रकला एलिमेंट्री व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत घवघवीत यश मिळाल्याची माहिती मुख्याध्यापक शिवाजी दुंडे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कला संचलनालय, मुंबई यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या एलिमेंट्री आणि इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा २०२४ चा निकाल नुकताच जाहीर झाला . एलिमेंट्री परीक्षेत ६४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ५ विद्यार्थ्यांना ए ग्रेड, १२ विद्यार्थ्यांना बी ग्रेड, ४७ विद्यार्थ्यांना सी ग्रेड मिळाली असून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर इंटरमिजिएट परीक्षेत ५८ विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १ विद्यार्थी ए ग्रेट, २५ विद्यार्थी बी ग्रेड, ३२ विद्यार्थी सी प्राप्त झाली आहे.

# भैरवनाथ मंदिराच्या विकासाला प्रारंभ

## पर्यटन विभागाकडून मंदिरासाठी एक कोटींचा निधी उपलब्ध



शिक्रापूर ता. शिरुर येथील भैरवनाथ मंदिराच्या कामाचा शुभारंभ करताना आमदार माऊली कटके व आदी.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज मंदिर परिसरासाठी मागील सरकारने मंजुर केलेल्या पर्यटन विभागाच्या एक कोटींच्या निधीचे वितरण नुकतेच झाले असून सदर कामाचा प्रारंभ देखील आमदार माऊली कटके यांचे हस्ते करण्यात आला आहे.

येथील भैरवनाथ मंदिर सुधारणेसाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याने सदर कामाचे उद्घाटन आमदार माऊली कटके यांचे हस्ते करण्यात आले, यावेळी सरपंच रमेश गडदे, माजी सरपंच रामभाऊ सासवडे, विश्वस्थ विश्वासबापू मांढरे, दिलीप कोठावळे, माजी जिल्हा परिषद सदस्या कुसुम मांढरे, रेखा बांदल, भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजाभाऊ मांढरे, नवनाथ सासवडे, विजय लोखंडे, अरुण सोंडे, अतुल धुमाळ यांसह आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर याबाबत बोलताना मागील सरकारच्या तत्कालीन पर्यटनमंत्री गिरीश महाजन व पर्यटन विभागाचे अवर सचिव मदन सोंडे यांच्या पुढाकाराने सदर काम मार्गी लागल्याचे भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजाभाऊ मांढरे यांनी सांगितले.

पुणे नगर महामार्गावरच हे देवस्थान असल्याने परिसर सुशोभिकरण करण्यासाठी भैरवनाथ देवस्थान ट्रस्टकडून एक कोटी एवढ्या निधीची मागणी मागील महायुती सरकारमधील पर्यटनमंत्री गिरीश बापट यांचेकडे करण्यात आली होती. त्याला मंजुरी मिळाली मात्र निधी वितरण झाले नव्हते. सरकार बदलले आणि सदर निधीचे वितरण झाल्याने या कामाचे औपचारीक भूमिपुजन आमदार माऊली कटके यांचे हस्ते करण्यात आले. सदर निधीतून मंदिरा परिसर सुशोभिकरण, संरक्षक भिंत उभारणी, दगडी कमान, पुरुष स्त्री शौचालय उभारणी आदी कामे केली जाणार असल्याने येथील वैभवात भर पडणार आहे.

## भाडेकरुंची माहिती देण्याचे आदेश

**शिक्रापूर :** जिल्ह्यात घरमालकांनी घरात भाडेकरु ठेवताना भाडेकरुंचे नाव, सध्याचा पत्ता, मूळ पत्ता, दोन छायाचित्रे, त्यांना ओळखणाऱ्या व्यक्तीचे नाव व पत्ता, भाडे करारनामा, ओळखपत्र आदींबाबतची कागदपत्रे स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये देण्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केले आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहत असल्याने, सदर ठिकाणी काम करण्यासाठी अनेक परप्रांतिय व अन्य ठिकाणचे नागरिक येत असल्याने, स्थानिकांनी अनेक खोल्या व घरे बांधून ते भाड्याने देण्याचे व्यवसाय सुरु केले आहेत. सदर ठिकाणी काम करणाऱ्यांना घरे भाड्याने दिली जातात. मात्र, गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर एखादा गुन्हा घडल्यावर त्याची तात्काळ उकल करण्यासाठी भाडेकरु म्हणून राहणाऱ्यांची संपूर्ण माहिती पोलीस ठाण्याकडे असणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिकांसाठी खबरदारीचा उपाय म्हणून घरमालकांनी भाडेकरुंची माहिती स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये सादर करावी, भाडेकरुंची माहिती स्थानिक पोलीस ठाण्याला न दिल्यास घरमालक हे भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहतील, असेही पुणे अपर जिल्हादंडाधिकारी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# विविध सहकारी संस्था या विकासाचा कणा



केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी खरेदी विक्री संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संवाद साधला. छाया - पोपट पाचंगे, कारेगाव.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था (सोसायटी) हा गावाच्या विकासाचा महत्वाचा कणा असून,यापुढील काळामध्ये सोसायट्या सक्षमपणे चालविण्यासाठी त्यांना ताकद देण्याचे काम केंद्रीय सहकार विभागामार्फत केले जाईल, असे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. मोहोळ यांनी नुकतीच शिरुर खरेदी विक्री संघाच्या कार्यालयास भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय जनता पक्षाचे क्रीडा विभागाचे अध्यक्ष संदीप भोंडवे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राहुल पाचर्णे, भाजपचे तालुकाध्यक्ष आबासाहेब सोनवणे, खरेदी विक्री संघांचे माजी अध्यक्ष राजेंद्र नरवडे, शरद कालेवार, बाळासाहेब नागवडे,संचालक संतोष मोरे, सर्जेराव दसगुडे, अप्पासाहेब वर्पे, दौलत खेडकर, प्रकाश थोरात, जाकीरखान पठाण, केशव लोखंडे, राहुल पवार, हर्षद ओस्तवाल, विनोद भालेराव आदी या वेळी उपस्थित होते.


# आंबेगावच्या पूर्व भागात चारा टंचाईचे सावट

## डोंगर माळरानावरील गवत वाळून गेल्याने दूध उत्पादकांची चिंता वाढली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात आतापासूनच हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. डोंगर माळरानावरील गवत वाळून गेल्याने, दूध उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. शेतकऱ्यांना जनावरांसाठी हिरवा चारा आता पासूनच विकत घेण्याची वेळ आली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागात शेतीपूरक म्हणून दुधाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर शेतकरी करतात. प्रत्येक शेतकऱ्याकडे दूध देणाऱ्या गाई, म्हशी मोठ्या प्रमाणावर आहेत.यंदा परतीच्या पावसाचा फटका डोंगर माळरानावरील चाऱ्याला मोठ्या प्रमाणावर बसला. चारा सडून गेला. त्यामुळे आता जानेवारी महिन्यापासूनच हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे.



वळती (ता.आंबेगाव)येथील भागडेश्वर डोंगर परिसरात चारा टंचाई निर्माण झाले आहे.दूध देणाऱ्या जनावरांना वाळलेला चारा खायला लागत आहे. (छाया : किशोर खुडे)

दूध देणाऱ्या जनावरांना खायला हिरवा चारा मिळत नसल्याने, दूध उत्पादनात घट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांना मका, घास, कडवळ हा हिरवा चारा दुसऱ्या शेतकऱ्यांकडून विकत घेऊन दूध देणाऱ्या जनावरांना खाऊ घालावा लागत आहे.अनेक दूध उत्पादक शेतकरी उसाचे हिरवेगार वाढे मोठ्या प्रमाणावर खरेदी करू लागले आहेत.

### पुढील दिवस कठीण

● गेल्या दोन वर्षांपासून डिसेंबर - जानेवारी महिन्यापासूनच चारा टंचाईच्या संकटाचा सामना करावा लागतोय. जनावरांना घेऊन दूरवर भटकंती करावी लागते. पुढील मार्च, एप्रिल, मे या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये चारा टंचाईचे संकट आणखी भयंकर होणार आहे. त्याचा दूध उत्पादनावर निश्चित परिणाम होऊन उत्पादन घटेल, असे गोपालक अतुल अजाब यांनी सांगितले.

# डॉक्टरांकडून चांगली सुविधा मिळावी : रक्षा खडसे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** बदलत्या काळानुसार आरोग्य सेवेमध्ये देखील अनेक बदल होत असताना डॉक्टरांकडून रुग्णांना चांगली सुविधा मिळावी असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले आहे.

येथील माऊलीनाथ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या अत्याधुनिक अतिदक्षता विभाग व शस्त्रक्रिया विभागांचे उद्घाटन नुकतेच केंद्रीत राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, शिरुरचे माजी आमदार अशोक पवार, माजी आमदार जगदीश मुळीक, सरपंच रमेश गडदे, उपसरपंच पूजा भुजबळ, रांजणगाव देवस्थानच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उद्योजक हरिष येवले, भाजपा किसान आघाडीचे सचिव जयेश शिंदे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्य बंडोपंत नवले, प्रशांत सासवडे, भीमराव गलांडे, संदीप तुपे, माऊलीनाथ हॉस्पिटलचे संचालक डॉ. पवन सोनवणे, डॉ. अजिंक्य तापकीर, डॉ. सायली तापकीर, डॉ. मंजिरी सोनवणे, डॉ. दिपक पाटील, डॉ. आकाश सोमवंशी, डॉ. उज्वला हाके, डॉ. अंकुश लवांडे, डॉ. कांचन साठे, डॉ. विशाल साठे, डॉ. चेतन कोलते, डॉ. रवींद्र टेमगिरे, रोहित खैरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माऊलीनाथ हॉस्पिटलचे संचालक डॉ. पवन सोनवणे यांनी केले, तर आभार डॉ. अजिंक्य तापकीर यांनी मानले.

## रस्त्यावरील सततच्या वाहतूक कोंडीतून लवकर होण्याची आशा मावळली

# प्रस्तावित कॉरिडॉरचे भवितव्य अधांतरीच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** पुणे सोलापूर व पुणे अहिल्यानगर रोडवरील वाहतूक कोंडीतून जनतेची सोडवणूक करण्यासाठी प्रस्तावित केलेले एलिव्हेटेड कॉरिडॉरचे दोन्ही प्रस्ताव केंद्र सरकारने मंजूर करून राज्य सरकारकडे रस्ते हस्तांतरित करण्यासह राज्य सरकारच्याच खर्चातून उभारणी करण्याचे प्रस्तावित केल्याने, आता हे प्रकल्प नेमके कधी सुरू होणार व कधी पूर्ण होणार याबाबत नागरिकांच्या मनात शंका उत्पन्न झाली आहे. यामुळे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरी यांनी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी, राज्य सरकार यांनी केलेल्या या रस्त्यांच्या सुधारणेसाठी केलेल्या मागण्यांच्या बाबत वेळोवेळी केलेल्या घोषणा व दिलेल्या आश्वासनांचे नेमके काय होणार ? असा प्रश्न जनतेच्या मनात घर करून बसला आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुणे नगर रस्त्यावरील चंदननगर ते शिरूर या टप्प्यांतील वाहतूक कोंडी आणि पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हडपसर ते यवत या टप्प्यांतील विशेषतः उरुळी कांचन येथील वाहतूक कोंडी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही रस्त्यावर वेगवेगळे प्रस्ताव राज्य सरकारकडून मागवले होते, त्याचा डी.पी.आर करून घेऊन त्यांच्या अखत्यारीतील रस्ते वाहतूक आणि महामार्ग विकास मंत्रालयातील तांत्रिक,आर्थिक तज्ञ सल्लागार यांच्या मदतीने तळेगांव चाकण शिक्रापूर या (राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी) दोन पदरी रस्त्याची सुधारणा करताना कि.मी.०/० ते २५/० व कि.मी.२५/० ते ५३/२०० अशा दोन भागातील प्रस्ताव एलिव्हेटेड फ्लायओव्हर बांधण्याच्या कामाला तसेच पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग ६५ वरील हडपसर कि.मी.८/८०० ते यवत कि.मी.४०/० या भागात सहा पदरी एलिव्हेटेड कॉरीडॉरच्या बांधकामांना मंजुरी देत असल्याची वल्गना लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अगोदर केली होती. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या आर्थिक तरतुदीतून ही कामे करण्यात येतील. लवकरच यासाठी निविदा प्रक्रिया सुरु होईल अशी माहिती निवडणूक प्रचारादरम्यान दिली जात होती.

मात्र, आता या बाबत वेगळीच माहिती पुढे आल्याने या दोन्ही रस्त्यांवर होणाऱ्या सततच्या वाहतूक कोंडीतून सर्वसामान्य जनतेची सुटका दुरापास्त झाली आहे असेच म्हणावे लागेल. कारण हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १४/१०/२०२४ च्या केंद्र सरकारच्या पत्रान्वये राज्य सरकारच्या एमएसआयडीसी या अंगीकृत प्राधिकरणाच्या ताब्यात देवून त्यांना केंद्र सरकारच्या मंजूर आराखड्याप्रमाणे आणि त्यांच्या मानकाप्रमाणे व संपूर्ण राज्य सरकारच्या आर्थिक तरतुदीतून करण्याचे कळविले आहे, याबाबीला खासदार अमोल कोल्हे व आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी दुजेरा दिला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील सततच्या वाहतूक कोंडीतून लवकर सुटका होण्याची आशा मावळली असल्याची भावना जनता बोलून दाखवीत आहे.

# चविष्ट कालन

रसगंधा

सामग्री तीच असली तरी वेगवेगळ्या खाद्यसंस्कृतीत वेगवेगळ्या पद्धतीने पाककृती बनवल्या जातात. सहाजिकच ही हटके चव आपल्याला खूप आवडते. चला तर मग, आज कालन ही केरळमध्ये प्रसिद्ध असणारी डिश कशी बनवायची ते पाहू या.

**सामग्री:** १०० ग्रॅम सुरण, एक कच्चं केळं, घोटलेलं दही, चार हिरव्या मिरच्या, चार चमचे तूप, अर्धा चमचा हळद, अर्धा चमचा मेथी पावडर, अर्धा चमचे मोहरी, एक चमचा जिरे, एक चमचा मिरी पावडर, तीन सुक्या मिरच्या, कढीपत्ता इत्यादी. वाटणासाठी: खोवलेला नारळ, जिरे.



**कृती:** प्रथम केळाची सालं काढून छोटे तुकडे करावे. सुरणाचेही छोटे तुकडे करावे. नारळ आणि जिरे वाटून घ्यावे. त्यानंतर मिरी पावडर अर्धा कप पाण्यात मिसळून गाळून घ्यावी. या पाण्यात मीठ आणि हळद घालून त्यात चिरलेल्या भाज्या शिजवून घ्याव्या. त्यात तूप आणि दही घालून ढवळून घ्यावं. मिश्रणाला उकळी आल्यावर त्यात नारळाचा चव आणि थोडी मेथी पावडर घालावी. आता दुसऱ्या कढईत मोहरी, सुक्या मिरच्या आणि कढीपत्ता घालून फोडणी करुन घ्यावी आणि ती कालनवर घालावी. तुमची हटके चवीची रुचकर डिश तयार आहे.

# अस्मिता

## पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या दिशेने...

मानिनी

***दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात रसायनं असतात. खाद्यपदार्थांपासून सौंदर्यप्रसाधनांपर्यंत प्रत्येक घटक आरोग्याला हानिकारक असतो. मात्र आपण त्यांचा वापर सुरूच ठेवतो. बंगळूरुतल्या एका महिलेने मुलीला सतावणाऱ्या ॲलर्जीतून धडा घेऊन जीवनशैली बदलायचं ठरवलं. हे बदल कुटुंबापुरते मर्यादित न ठेवता स्थानिकांपर्यंत पोहोचवले. स्मिता कामत असं या महिलेचं नाव. त्यांच्या प्रवासाविषयी...***

स्मिता कामत या एकेकाळी बंगळूरुत आयटी क्षेत्रात नोकरी करायच्या. त्यांच्या अवघ्या दोन वर्षांच्या मुलीच्या नाजूक त्वचेला ॲलर्जीने ग्रासलं होतं. फोड, पुरळ, मुरमं नित्याचं होऊन बसलं. तिच्यावर औषधोपचार सुरू असताना स्मिता यांनी या ॲलर्जीच्या कारणांच्या मुळाशी जायचं ठरवलं. कुटुंबाच्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचा आढावा घ्यायचं ठरवलं. यातून त्यांना धक्कादायक गोष्टी कळल्या. आपण वापरत असलेल्या प्रत्येक वस्तूत, खाद्यपदार्थांमध्ये घातक रसायनं असतात हे त्यांच्या लक्षात आलं.

हीच घातक रसायनं, कृत्रिम घटक गंभीर स्वरूपाच्या ॲलर्जीपासून विविध रोगांना कारणीभूत ठरू शकतात. गायीच्या दुधापासून विविध प्रकारच्या मसाल्यांपर्यंत स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या बऱ्याच घटकांची भारतीयांना ॲलर्जी असते, असं संशोधन त्यांच्या नजरेत आलं. सौम्य स्वरूपाची ॲलर्जी वाढत्या वयानुसार दूर होत असली तरी विशिष्ट पदार्थामुळे आयुष्यभर त्रास होऊ शकतो हेही त्यांनी वाचलं. स्मिता यांनी काही वर्षं याचा अभ्यास केला. कार्यशाळा, सेमिनार्समधून बरंच ज्ञान मिळवलं. वर्षानुवर्ष वापरात असलेली कृत्रिम घटक तसंच रसायनांची युक्त उत्पादनं विविध प्रकारच्या ॲलर्जी तसंच व्याधींना कारणीभूत ठरत असल्याच्या निष्कर्षापर्यंत त्या पोहोचल्या. मग आयुष्यात सकारात्मक बदल घडवून नैसर्गिक घटकांचा अधिकाधिक वापर करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.



साधारण सात वर्षांपूर्वी त्यांच्या या नव्या आयुष्याला सुरूवात झाली. स्थानिक वातावरणात पिकवलेली धान्य, फळं, भाज्या घ्यायला त्यांनी सुरूवात केली. बाहेरच्या राज्यातली तसंच देशातली फळं घेणं टाळलं. हातसडीचा तांदूळ, नाचणी, ज्वारी, बाजरी अशा धान्यांकडे त्या वळल्या. मांसाहारावर मर्यादा आणल्या. यामुळे मुलीची ॲलर्जी कमी झाली. हातापायांवरचं पुरळ निघून गेलं. यामुळे आपला मार्ग योग्य असल्याची जाणीव त्यांना झाली. स्मिता कामत एवढ्यावर थांबल्या नाहीत. त्यांना याबाबत जागरूकता निर्माण करायची होती. घातक रसायनांचे धोके लोकांपर्यंत पोहोचवायचे होते. त्यांनी कम्युनिटी सेंटर सुरू केलं. स्थानिक शेतकरी, उत्पादकांना मार्गदर्शन करायला सुरूवात केली. या केंद्राच्या माध्यमातून त्या नैसर्गिक घटकांनी युक्त, रसायनमुक्त उत्पादनं तयार करतात. अगदी काजळापासून फरशी पुसायच्या फिनाईलपर्यंत विविध उत्पादनं या केंद्रात तयार होतात. बंगळूरूच्या जवळ चन्नापटना भागात 'देवारा काडू' नावाचं हे कम्युनिटी सेंटर आहे. या केंद्रात शेतकऱ्यांना स्थानिक धान्यांची लागवड करण्याबाबत मार्गदर्शन केलं जातं. शेतीच्या कामात रासायनिक खतं, किटकनाशकांचा वापर न करण्याचा सल्ला दिला जातो. हा उपक्रमाचं रुपांतर एका लघुउद्योगात झालं आहे. 'प्राण पूर्णा' या नावाने त्यांची उत्पादनं देशातल्या अनेक शहरांमध्ये विक्रीसाठी जातात. यामुळे स्थानिकांनाही रोजगार मिळतो आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या दिशेने स्मिता यांनी टाकलेलं पाउल येत्या काळात बराच मोठा बदल घडवू शकेल.

### मेक अप टिप्स

**रंगीत आयलायनर वापरताना...**



सध्या रंगीत आयलायनरचा ट्रेंड आहे. बाजारात रंगीबेरंगी आयलायनर्स उपलब्ध असले तरी आपल्या त्वचेला आणि व्यक्तिमत्त्वाला साजेसा आयलायनर निवडायला हवा. शक्यतो पेन्सिल आयलायनर विकत घ्या. लिक्विड आयलायनर आवडत असेल तर लावण्यासाठी ब्रशही योग्य हवा. अशा लायनरसाठी पातळ किंवा अँगल्ड ब्रश योग्य ठरतो. लिक्विड आयलायनर कोणत्याही रंगाचा असला तरी ब्रशच्या निवडीवर बरंच काही अवलंबून असतं हे लक्षात ठेवा.

### हेअर केअर

**केसांसाठी ऑलिव्ह ऑईल**



केसांसाठी आपण खोबरेल, आवळा, बदाम, भृंगराज असे घटक असणाऱ्या तेलांचा वापर करतो. मात्र ऑलिव्ह ऑईलच्या वापराने त्वचेच्या बऱ्याच समस्या दूर होऊ शकतात. या तेलात झिंक, कॅल्शियम, ब जीवनसत्त्व, सल्फरसारखे पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात. यातल्या अँटिऑक्सिडंट्समुळे केस आणि स्कॅल्पचं आरोग्य उत्तम राहतं. ऑलिव्ह ऑईलमुळे केस कोरडे होत नाहीत. काही काळानंतर ते चमकदार दिसू लागतात. दोन अंड्यांच्या पांढऱ्या भागात दोन चमचे ऑलिव्ह ऑईल घालून हे मिश्रण केसांना लावा. लसणाच्या तीन ते चार पाकळ्या वाटून घ्या. पाव कप ऑलिव्ह ऑईलमध्ये ही पेस्ट घालून ४५ मिनिटं केसांना लावा. मग धुवून टाका. ऑलिव्ह ऑईल आणि आल्याचं मिश्रणही उपयुक्त ठरेल.

### हेल्दी लाईफ

**कारणं गरोदरपणातल्या पोटदुखीची**



गरोदरपणात महिलांना जास्त काळजी घ्यावी लागते. या दिवसात पोटदुखी जाणवते. मात्र एकसारखं पोटात दुखत असेल तर लगेच तपासणी करून घ्यायला हवी. पोटातल्या तीव्र वेदना हे गर्भपाताचं लक्षण ठरू शकतं. वेळेआधी होणाऱ्या प्रसूतीकडे पोटदुखी अंगुलीनिर्देश करते. ॲपेंडिक्सच्या जंतूसंसर्गामुळे असं होऊ शकतं. मूत्रमार्गाच्या जंतूसंसर्गामुळेही पोटात वेदना जाणून शकतात. त्यामुळे या दिवसातल्या कोणत्याही शारीरिक बदलाकडे दुर्लक्ष करू नका.

## सेफ डेस्टिनेशन्स...


भटकंती

पर्यटन म्हणजे महिलांचा आवडीचा विषय. नेहमीच्या धबडग्यातून विरंगुळ्याचे चार क्षण देणारा हा काळ अगदी हवाहवासा वाटतो. म्हणूनच जोडीदारीची वाट न पाहता त्या एकट्यादुकट्या प्रवास करण्यासही मागेपुढे पहात नाहीत. पण अशावेळी महिलांनी फिरायला जाताना सुरक्षेचा विचार करायला हवा. आपल्या देशात अशी काही ठिकाणं आहेत जिथे महिला एकट्यानं किंवा ग्रुपनं अगदी बिनधास्त भटकू शकतात.

**अनेगुंडी (कर्नाटक) :** तुंगभद्रा नदीच्या किनारी वसलेलं अनेगुंडी हे ठिकाण महिला पर्यटकांसाठी सुरक्षित मानलं जातं. या ठिकाणी तुम्ही स्थानिकांच्या घरात भाड्यानं राहू शकता. या परिसरातील स्थानिक मनमिळावू आणि मदत करणारे आहेत. अनेगुंडीचं निसर्गसौंदर्य तुम्हाला मोहात पाडेल यात शंका नाही. अनेगुंडीच्या आसपास पर्वत, गुंफा अशी फिरण्याची ठिकाणं आहेत.

**माउंट अबू :** राजस्थानातलं एकमेव थंड हवेचं ठिकाण म्हणजेच माउंट अबू. हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. महिलांच्या दृष्टीनं हे ठिकाण अत्यंत सुरक्षित आहे. त्यामुळे तुम्ही या पर्यटनस्थळी भटकंतीचे बेत ठरवू शकता. अबूला कायम पर्यटकांची गर्दी असते. येथे एकट्या पर्यटकालाही भरपूर मजा करता येईल.

**कुर्ग (कर्नाटक ) :** एकट्या महिला प्रवाशांसाठी कुर्गइतकं सुरक्षित दुसरं कोणतंही ठिकाण नाही. कुर्गच्या आसपास बघण्यासारखी अनेक ठिकाणं आहेत. कुर्ग कॉफीसाठी प्रसिद्ध आहे. तुम्हाला तिथे उत्तम दर्जाच्या कॉफीच्या बिया मिळू शकतात. कुर्ग हे कर्नाटकातलं थंड हवेचं ठिकाण आहे.





**मसुरी (उत्तराखंड) :** मसुरी हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. एकट्यानं पर्यटनाला जाणाऱ्या महिलांसाठी मसुरी हे सुरक्षित ठिकाण आहे. मसुरीवर निसर्गानं मुक्तहस्तानं उधळण केली आहे. त्यामुळेच पर्यटकांचं मसुरी हे फेवरिट डेस्टिनेशन ठरलंय. तेव्हा थंडीतल्या आल्हाददायक वातावरणाचा मुहूर्त साधा आणि भटकंतीसाठी बाहेर पडा.

## धडाडीने पुढे जा

समुपदेशन




मी एक लघुउद्योजिका असून आम्ही दोघी मैत्रिणींनी एकत्र येऊन तिच्या जागेमध्ये हा केटरिंग व्यवसाय सुरू केला. हळूहळू भांडवल वाढवलं. आता दहा वर्षानंतर व्यवसायाचा चांगला जम बसला आहे. ग्राहकसंख्या चांगली असून नफ्याचं प्रमाणही चांगलं आहे. पण आत्तापर्यंत जीवाभावाची असणारी ही मैत्रीण आता मात्र भागीदारी संपवण्याची भाषा बोलतीये. मला व्यवसायातून बाहेर काढून स्वत:च्या बहिणीला त्यात सामावून घेण्याचा तिचा मानस स्पष्ट होत आहे. हा विश्वासघात आहेच त्याचबरोबरच तिच्या या निर्णयामुळे मला खूप मोठा आर्थिक फटकादेखील बसणार आहे. कारण दुसरीकडे व्यवसाय सुरू करण्यासाठी माझ्याकडे जागा नाही. कामगारवर्गही तिने आपल्याकडे वळवून घेतला आहे. हे नुकसान मी कसं भरुन काढू? काय करु?

– पैसा दिसू लागला की भलेभले भुलतात. त्यामुळे तुझ्या मैत्रिणीने काही वेगळे रंग दाखवले नाहीत हे समजून घे आणि या धक्क्यातून लवकरात लवकर सावरुन पुढील नियोजन कर. सर्वप्रथम तुला कुठे कुठे वाव आहे याचा विचार कर. आत्ताच विकत घ्यायची नसेल तर भाड्याने एखादी जागा बघ. ग्राहकांपर्यंत पोहोचणं शक्य नसेल तर एखाद्या मंगल कार्यालयात, हॉलमध्ये, मेसमध्ये अथवा विकेंड होम्सच्या स्कीममध्ये केटरिंग सेवा देण्याच्या संधींची चाचपणी कर. अर्थातच त्यासाठी तुला नवीन टीमची जुळणी करावी लागेल. पण आता पाऊल मागे घेऊ नकोस. तुझं भांडवल आणि गुडवील घेऊन बाहेर पड आणि धडाडीने पुढे जा. एक ना एक दिवस तुझ्या मैत्रिणीला कृत्याचा पश्चाताप होईल असं यश मिळवण्याची स्वप्नं पहा.

## डिजिटल मार्केटिंगविषयी थोडंसं...

स्कील डेव्हलपमेंट

सध्या सगळंच डिजिटल झालं आहे. इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे प्रत्येकालाच आपला व्यवसाय ऑनलाईन व्यासपीठावर आणायचा आहे. व्हॉट्स ॲपने तर बिझनेस ॲपच काढलं. फेसबुकवरही बऱ्याच जाहिराती पहायला मिळतात. फेसबुक पेज काढून व्यवसाय करणारे अनेक जण आहेत. यातूनच करीअरच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. काही कारणांनी नोकरी सोडावी लागली असेल तर डिजिटल मार्केटिंगचं तंत्र आत्मसात करून तुम्ही तुमच्या वेळेनुसार काम करू शकता.



ऑनलाईन मार्केटिंगची गरज प्रत्येकालाच आहे. अर्थात डिजिटल मार्केटिंगचं विश्व फक्त सोशल मीडियापुरतं मर्यादित नाही. ई मेलच्या माध्यमातूनही व्यवसायवृद्धी करता येते. आवश्यक कौशल्यं विकसित केली तर यातूनही चांगलं उत्पन्न मिळवता येतं.

डिजिटल मार्केटिंगमध्ये जम बसवल्यानंतर तुम्ही तासाला एक हजार ते तीन हजार रुपये मिळवू शकता. यासाठी तुम्ही या क्षेत्राची पूर्ण माहिती घ्यायला हवी. ज्ञान मिळवायला हवं. डिजिटल मार्केटिंगशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कुठेही लांब जाण्याची गरज आहे. हे अभ्यासक्रम ऑनलाईन आणि मोफत उपलब्ध आहेत. गुगलचा डिजिटल मार्केटिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहे. कोर्सेरा डॉट कॉमवरही तुम्हाला मार्गदर्शन मिळेल. यामुळे अवघ्या महिनाभरातच तुम्ही डिजिटल मार्केटर म्हणून काम करू शकाल.

सुरूवातीला स्थानिक व्यावसायिकांना भेटा. त्यांचा व्यवसाय ऑनलाईन माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रस्ताव ठेवा. फेसबुक ग्रुप्सवरही तुम्हाला हे पर्याय मिळू शकतील. फ्रीलान्सर, वर्कसेरासारख्या व्यासपीठांद्वारेही तुम्ही करीअर पुढे नेऊ शकता. पुढे लोकप्रिय ब्रँड, कंपन्या यांचाही विचार करता येईल.

## ऑफिसमधली फॅशन जपण्यासाठी...

स्टाईल स्टेटमेंट



ऑफिसमध्ये काय घालायचं, हा प्रश्न महिलांना कायमच पडलेला असतो. कामाच्या ठिकाणी फार झगमगीत कपडे घालता येत नाहीत. फॉर्मल लूक राखावा लागतो. अशा वेळी एकसारखा पेहराव करून कंटाळा येतो. टिपिकल कुर्ते, सलवार कमीज, साडी, ट्राउझर–शर्ट काही काळ बाजूला ठेवावेसे वाटतात. मात्र यातच थोडे बदल करून तुम्ही फॅशनेबर राहू शकता. ऑफिस लूकला ट्विस्ट देण्याच्या या काही टिप्स...

✻ वैविध्यपूर्ण कुर्ते खरेदी करा. प्लेन, प्रिंटेड, लाँग, फिटेड, लूज यातला प्रत्येक प्रकार तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायला हवा. यामुळे तुम्हाला कूल लूक मिळेल. योग्य कॉम्बिनेशन करून मस्त ट्रेंडी राहत येईल.

✻ सलवार किंवा लेगिंगऐवजी पलाझो तसंच सिगारेट पँट ट्राय करता येतील. लांब कुर्त्यांवर हे बॉटम्स शोभून दिसतात. नक्षीकाम केलेले, स्ट्रेट कुर्तेही यावर घालता येतील.

✻ ऑफिसमध्ये फॉर्मल्स घालण्याची सक्ती नसेल तर जीन्स आणि शॉर्ट कुर्ती हे कॉम्बिनेशनही हिट आहे.

✻ ऑफिसमध्ये साड्याही खूप छान दिसतात. फॅन्सी आणि भारदस्त लूकसाठी साडी नेसत असाल तर तुमच्याकडे कॉटन, लिनन, शिफॉन, जॉर्जेट आणि क्रेपच्या साड्या असायला हव्या. साड्यांचे हे प्रकार ऑफिससाठी बेस्ट आहेत.

✻ एथनिक्ससोबत पादत्राणंही तितकीच फॅन्सी हवीत. पारंपरिक पादत्राणांची मोठी रेंज उपलब्ध आहे. कोल्हापुरी किंवा मोजडी पारंपरिक लूकला चार चांद लावेल.

✻ अनारकली कुर्त्यांचा पर्यायही तुमच्याकडे आहे. यामुळे तुम्हाला थोडा वेगळा लूक मिळेल. ऑफिससाठी सिंपल लूकवाले अनारकली घ्या.

✻ नक्षीकाम केलेल्या तसंच प्रिंटेड, वर्कवाल्या कुर्त्यांसोबत प्लेन सलवार छान दिसतील. सडपातळ महिला पटियाला सलवार घालू शकतात. कुर्त्यावर सलवारऐवजी स्लिट पँट, धोती सलवार किंवा ट्राउझरही घालता येईल.

## स्कार्फचा आगळा नखरा

फॅशन पॅशन

थंडीचा कडाका वाढतोय. रात्रीबरोबर दिवसाही गरम कपड्यांची ऊब हवीहवीशी वाटतीये. तुम्ही स्टायलिश स्वेटर्स, शॉल, श्रग, जॅकेट्स तुम्ही बाहेर काढली असतीलच. यासोबतच विंटर स्टायलिंगमध्ये महत्त्वाची भूमिका असते ती स्कार्फची...आकर्षक डिझाईन्सचे स्कार्फ तमाम महिलावर्गाचं लक्ष वेधत आहेत. स्कार्फ हे तरूण मुलींचं स्टाईल स्टेटमेंटच आहे. तुम्ही वेगवेगळ्या पद्धतींनी स्कार्फ बांधू शकता आणि स्टायलिश दिसू शकता. सध्या ट्रेंड आहे तो बेल्टेड स्कार्फचा, म्हणजेच तुमच्या बेल्टसोबत स्कार्फ बांधण्याचा. तर पाहु या बेल्टसोबत स्कार्फ कॅरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती...



* बेल्टेड स्कार्फ लूकसाठी स्कार्फची निवड योग्य असायला हवी. ही स्टाईल फॉलो करण्यासाठी खूप जाड स्कार्फ घेऊ नका. सिल्क किंवा लाइट वेट कॉटनचा स्कार्फ निवडा

* तुमच्या स्कार्फच्या वजनावर बेल्टचा आकार ठरवा. स्कार्फचं कापड जेवढं जाड तेवढा मोठ्या आकारचा बेल्ट असावा. पण बेल्टेड स्कार्फ लूकसाठी बेल्ट जरा बारीकच असून द्या. या लूकसाठी जाड किंवा मेटल बेल्ट योग्य ठरणार नाही. बेल्टेड स्कार्फ लूकसाठी बारीक बेल्ट आणि कमी वजनाचा स्कार्फ हे कॉम्बिनेशन योग्य आहे.

* बेल्ट तुमच्या कमरेच्या आकाराचा असू द्या. बेल्ट कमरेच्या थोडा वर बांधा. यामुळे बेल्टच्या खाली आणि आजूबाजूला स्कार्फ येऊ शकेल.

* या लूकसाठी स्कार्फही हलता राहायला हवा. तो एकदम टाईट बसला तर या लूकची मजा जाईल. त्यामुळे स्कार्फची टोकं बांधू नका. त्यांना मोकळंच राहू द्या.

* स्कार्फच्या लांबीकडेही लक्ष द्यायला हवं. बेल्टेड स्कार्फ बांधल्यावर स्कार्फ तुमच्या गुडघ्याच्या थोडासा वर असू द्या.

* ड्रेसवर स्कार्फ बांधणं हे झकास कॉम्बिनेशन आहेच पण एखाद्या ब्लेझर किंवा कार्डिगॅनवरही हा स्कार्फ स्टायलिश लूक देतो.

## पार्टीत पोटोबा जपा

डाएट


सध्याच्या लग्नसराईच्या दिवसात वारेमाप खाणं होतं आणि डाएटचा पुरता फज्जा उडतो. आहाराचं सगळं शेड्यूलच बिघडून जातं. जीभेवर कितीही ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला तरी पार्टीतले तोंडाला पाणी आणणारे पदार्थ खाल्ल्याशिवाय राहावतच नाही. पण कॅलरीज वाढू नयेत यासाठी थोडी काळजी तर घ्यायलाच हवी.

✻ पार्टीला जाण्याआधी थोडंस खा. पार्टीत हादडायचं आहे म्हणून उपाशी पोटी जाऊ नका. उपाशी राहिल्यानं तुम्ही गरजेपेक्षा जास्त खाल. ✻ ताटात एकदम जेवण वाढून घ्या. पुन्हा पुन्हा वाढून घेऊ नका. बुफे टेबलपासून जरा लांबच राहा. यामुळे तुम्हाला खाण्यावर नियंत्रण ठेवणं सोपं जाईल. ✻ पार्टी असो की लग्नसमारंभ तळकट, मसालेदार, गोड, भरपूर क्रीम असणारे पदार्थ टाळा. ✻ एकदा खाणं झाल्यावर पुन्हा घ्यायच्या आधी २० मिनिटं थांबा. पोट भरल्याचा संदेश मेंदूपर्यंत पोहोचण्यासाठी २० मिनिटं लागतात. यामुळे मधल्या २० मिनिटांत शरीराला गरज नसताना अन्न घेतलं जाणार नाही. ✻ मिठाई किंवा अन्य गोड पदार्थ टाळणं शक्य नसल्यास ते इतरांसोबत शेअर करा. घरी गोड करायचं असेल तर लो फॅट दूध तसंच कमी कॅलरीवाले दुधाचे पदार्थ वापरा. साखरेऐवजी गूळ, मध, फळं, सुकामेवा किंवा आर्टीफिशिअल स्वीटनर यांचा वापर करा. ✻जेवताना सावकाश होऊ द्या, असं सांगायची पद्धत आहे. पार्टीच्या वेळी हा सल्ला पाळा. कारण सावकाश आणि चावून खाल्ल्यानं गरजेपेक्षा जास्त खाणं होणार नाही. ✻ दुपारी जास्त खाल्लं असेल तर रात्री साधं आणि कमी जेवा. सॅलड, सूप, उकडलेल्या भाज्या, कोशिंबिरी, डाळ, साधा भात असा हलका आहार तुम्ही निवडू शकता ✻ पार्टीमध्ये कोल्ड ड्रिंकऐवजी लिंबूपाणी, नारळपाणी अशा पेयांना प्राधान्य द्या. ✻ पार्टी किंवा लग्नात भरपूर पदार्थ असतात. त्यातून तुम्हाला हवे ते पदार्थ निवडा. उगाचच चव घ्यायची म्हणून सगळे पदार्थ खाऊ नका. ✻ तुम्हाला भेट म्हणून मिळालेले गोड पदार्थ एकाच वेळी संपवू नका. त्यातील तुमच्यासाठी काही जिन्नस ठेऊ न उरलेलं शेजाऱ्यांना किंवा ऑफिसमधल्यांना वाटून टाका. यामुळे तुमच्या शरीरात कमी कॅलरीज जातील.



## At a Glance

### सोन्याला झळाली



**नवी दिल्ली :** स्थानिक बाजारात सातत्याने होत असलेल्या खरेदीमुळे शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशी सोन्याचे दर ७०० रुपयांनी वधारून ८२,००० रुपये प्रति १० ग्रॅमच्या विक्रमी उच्चांकी पातळीवर पोहोचले. गुरुवारी सोन्याचा भाव ८१,३०० रुपये प्रति १० ग्रॅम वर स्थिरावला होता.

### बसपचे दिल्लीत ७० उमेदवार

**नवी दिल्ली :** बहुजन समाज पक्षाने (बसप) दिल्ली विधानसभेच्या सर्व ७० जागांसाठी उमेदवार ांची घोषणा केली आहे. बसपचे केंद्रीय समन्वयक नितीन सिंह यांनी सांगितले की, या यादीमध्ये प्रमुख अनुभवी नेते आणि नवीन चेहऱ्यांचा समावेश आहे. गोकलपूरमधून लाल सिंह, घोंडामधून सुंदर लोहिया, कोंडलीतून मुकेश कुमार आणि किराडी मतदारसंघातून जुगवीर सिंह निवडणूक लढवणार आहेत.

### इस्रायलने लेबनॉनमधून माघार घ्यावी

**बेरुत :** इस्रायलने लेबनॉनच्या प्रदेशातून माघार घ्यावी आणि लेबनॉनमध्ये लष्करी कारवाया थांबवाव्यात, असे संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी म्हटले आहे. इस्रायलच्या सीमेजवळील दक्षिण लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या शांतता दलाच्या मुख्यालयाला भेट देताना गुटेरेस यांनी शुक्रवारी हे वक्तव्य केले.

# भारत-बांगलादेशात पुन्हा तणाव

## मालदा जिल्ह्यात बीएसएफ आणि बांगलादेशच्या सैनिकात वादंग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सीमा सुरक्षेवरून भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणाव वाढला आहे. पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यातील शुकदेवपूर गावात भारतीय सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि बॉर्डर गार्ड ऑफ बांगलादेश (बीजीबी) यांच्यात वाद झाला. सीमेवर कुंपण घालण्याच्या भारताच्या प्रयत्नांमुळे नव्याने वादंग झाला आहे. द्विपक्षीय कराराचे उल्लंघन करून भारत भारत-बांगलादेश सीमेवर पाच ठिकाणी कुंपण बांधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बांगलादेशने केला आहे, तर भारताने बांगलादेशाने घेतलेला आक्षेप फेटाळून लावला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने पुन्हा एकदा या मुद्द्यावर भारताची भूमिका स्पष्ट केली आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी सांगितले की, आम्ही आमची भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही बांगलादेशच्या कार्यवाहक उपउच्चायुक्तांना बोलावून सीमेवरील कुंपणाबाबत आमचे म्हणणे मांडले. बांगलादेशला लागून असलेली गुन्हेगारीमुक्त सीमा सुनिश्चित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. तस्करी, मानवी तस्करी आणि इतर गुन्हे रोखण्यासाठी कुंपण, सीमेवर प्रकाशयोजना, तांत्रिक उपकरणे बसविणे, जनावरांचे कुंपण अशा उपाययोजना केल्या जात आहेत.

भारत-बांगलादेश सीमेची लांबी ४,०९६ किमी असून, यावरून बराच काळ वाद सुरू होता. अलीकडेच भारताने सीमेवर पाच ठिकाणी कुंपण घालण्याची योजना आखली होती, ज्याला बांगलादेशने कडाडून विरोध केला होता. शुकदेवपूर गावात कुंपण घालण्याच्या प्रयत्नावरून निर्माण झालेल्या वादामुळे दोन्ही देशांमधील आधीच ताणलेले संबंध आणखी बिघडले आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, नूर अल-इस्लाम यांना सांगण्यात आले की भारताने सीमेवरील सुरक्षा उपायांसंदर्भात दोन्ही सरकारांमधील सर्व प्रोटोकॉल आणि करारांचे पालन केले आहे. बांगलादेश दोन्ही देशांमध्ये यापूर्वी झालेल्या सर्व सामंजस्य करारांची अंमलबजावणी करेल आणि सीमेपलीकडील गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी सहकार्याचा दृष्टिकोन अवलंबेल, अशी भारताला आशा आहे.

बांगलादेशचे भारतातील कार्यवाहक उच्चायुक्त नूर अल इस्लाम यांना परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी दुपारी दोन वाजता साऊथ ब्लॉक येथे समन्स बजावले. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारताने कुंपण घालण्यासह सीमा सुरक्षा उपायांसंदर्भात दोन्ही सरकारे आणि सीमा सुरक्षा दल आणि बॉर्डर गार्ड बांगलादेश (बीजीबी) यांच्यातील सर्व प्रोटोकॉल आणि करारांचे पालन केले आहे. सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी काटेरी कुंपण उभारणे, सीमेवर प्रकाश टाकणे, तांत्रिक उपकरणे बसविणे आणि जनावरांचे कुंपण घालणे हे उपाय आहेत, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. बांगलादेशकडून पूर्वीच्या सर्व सामंजस्य करारांची अंमलबजावणी केली जाईल आणि सीमेपलीकडील गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी सहकार्याचा दृष्टिकोन अवलंबला जाईल, अशी भारताला आशा आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

सीमेपलीकडील गुन्हेगारी कारवाया, तस्करी, गुन्हेगारांच्या हालचाली या आव्हानांना प्रभावीपणे तोंड देऊन गुन्हेगारीमुक्त सीमा सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार भारताने केला आहे.

### द्विपक्षीय संबंधांवर परिणाम

● गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये बांगलादेशमध्ये सत्तांतर झाले असताना भारत आणि बांगलादेश यांच्यातील वाद सुरू झाला आहे. शेख हसीना यांच्या जागी नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार बांगलादेशात स्थापन करण्यात आले आहे. युनूस सरकारच्या नेतृत्वामुळे द्विपक्षीय संबंध बिघडले असून, सीमावादामुळे ते अधिकच गुंतागुंतीचे झाले आहेत. त्याशिवाय बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेले हल्लेही चिंताजनक असेच आहेत.

### भारताने बांगलादेशच्या कार्यवाहक उच्चायुक्तांना समन्स बजावले

● १३ जानेवारी रोजी भारताने बांगलादेशचे कार्यवाहक उच्चायुक्त नूर-अल-इस्लाम यांना बोलावून सांगितले की, भारताने दोन्ही शेजारी देशांमधील सीमेवर कुंपण बांधताना सर्व नियमांचे पालन केले आहे. बांगलादेशने भारताचे उच्चायुक्त प्रणय वर्मा यांना शेजारच्या देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाने समन्स बजावून सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) हालचालींवर तीव्र चिंता व्यक्त केली होती.

### सीमा सुरक्षा उपाय आणि करार

● सीमेवर कुंपण घालण्याचा उद्देश अतिक्रमण रोखणे हा आहे आणि यापूर्वी झालेल्या करारानुसार हे केले जात असल्याचे भारताचे म्हणणे आहे. या करारांचे पालन करून बांगलादेश सीमेचे उल्लंघन रोखण्यासाठी भारतासोबत काम करेल, अशी आशा प्रवक्त्याने व्यक्त केली.

# फडणवीस २० ते २४ दरम्यान दावोसमध्ये



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होणार आहेत. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे.

यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात ३ वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी झाले होते. त्यावेळी औद्योगिक विकासात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आला होता. राज्यात २०१४-१९ काळात मॅग्नेटिक महाराष्ट्राचे दोन वेळा आयोजन झाले. आताही या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भरगच्च कार्यक्रम दावोस दौऱ्यात राहणार आहेत. अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत. या दौऱ्यात उद्योगमंत्री उदय सामंत तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल.

डेटा सेंटर्स, ऑटोमोबाईल्स, सेमिकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येने सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक राज्यात आणण्याचा प्रयत्न या दौऱ्यातून साध्य करण्याचा प्रयत्न होईल आणि यातून रोजगारनिर्मितीचेही उद्दिष्ट साध्य केले जाणार आहे. महाराष्ट्राने विविध प्रकारची धोरणे अलिकडेच जाहीर केली आहेत, त्याबाबत सुद्धा ते विविध व्यावसायिक बैठकांमध्ये अवगत करतील. महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला चालना देण्याचा मुख्यमंत्री फडणवीस या दौऱ्यातून प्रयत्न करणार आहेत.

### सर्व विभागात गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न

● दरम्यान, राज्यात गुंतवणूक आणताना किंवा पायाभूत सुविधांचा विकास करताना आम्ही सातत्याने चौफेर विकास कसा होईल आणि प्रादेशिक समतोल कसा राखला जाईल, यावर भर दिला. या दावोस दौऱ्यात महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात आणि सर्व विभागात गुंतवणूक कशी येईल, यादृष्टीने आमचे प्रयत्न असतील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# ब्रह्मोसने वाढवली चीनची चिंता

## फिलिपिन्सपाठोपाठ इंडोनेशियाही घेणार क्षेपणास्त्र

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतात तयार झालेल्या ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्राने फिलिपिन्स सुसज्ज झाल्यानंतर, आता इंडोनेशियाही हे क्षेपणास्त्र घेण्याच्या तयारीत आहे. एप्रिलमध्ये फिलिपिन्सला या क्षेपणास्त्राची पहिली खेप मिळाल्यानंतर, इंडोनेशिया लवकरच ४५० दशलक्ष डॉलरच्या करारावर स्वाक्षरी करणार आहे. हा करार भारताच्या सर्वात मोठ्या संरक्षण निर्यात करारांपैकी एक असेल.

माध्यमातील वृत्तानुसार, ब्रह्मोस क्षेपणास्त्रांच्या वाढत्या मागणीमागे चीनचे आक्रमक लष्करी धोरण आणि दक्षिण चीन समुद्रातील विस्तारवादी कारवाया कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. चीनचा 'नाइन डॅश लाइन'चा वादग्रस्त दावा आणि त्याच्या वाढत्या लष्करी कारवायांमुळे आजूबाजूच्या देशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि मलेशिया सारखे देश ब्रह्मोस क्षेपणास्त्राला आपल्या संरक्षणाचा भक्कम आधार मानत आहेत.

चीनचा धोका आपल्या किनाऱ्यापासून ३०० किलोमीटर दूर ठेवण्यास सक्षम असलेले कोस्टल बॅटरी आवृत्तीचे ब्रह्मोस क्षेपणास्त्र फिलिपिन्सला नुकतेच मिळाले आहे. ब्रह्मोसची अचूकता आणि वेग यामुळे दक्षिण चीन समुद्रातील चीनच्या नौदल आणि जमिनीशी संबंधित धोक्यांचा सामना करण्यासाठी हे एक प्रभावी साधन आहे, असे तज्ञांचे मत आहे.

इंडोनेशिया आपल्या विशाल द्वीपसमूह आणि सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी आपली लष्करी ताकद वाढवत आहे. आता या क्षेपणास्त्राला आपल्या संरक्षण यंत्रणेचा महत्त्वाचा भाग बनवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

### संरक्षण निर्यातीत ऐतिहासिक वाढ

● ब्रह्मोसची मागणी वाढल्याने भारताच्या संरक्षण निर्यातीतही ऐतिहासिक वाढ होणार आहे. हे भारतीय संरक्षण उद्योगाच्या तांत्रिक आणि व्यावसायिक क्षमतेची साक्ष आहे आणि हे प्रादेशिक सुरक्षेत भारताच्या वाढत्या भूमिकेचे प्रतिबिंब आहे. इंडोनेशियाबरोबरचा हा करार भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणातील आणखी एक मजबूत पाऊल ठरेल, जो या भागात शांतता आणि स्थैर्य राखण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

### दिल्लीतील लाडक्या बहिणींना २,५००

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनाम्याचा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे. भाजपचे ठराव पत्र पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांनी मांडले. यावेळी जेपी नड्डा म्हणाले की, भाजपचे सरकार दिल्लीत सत्तेवर आल्यावर तेथील महिलांना दरमहा २,५०० रुपये दिले जातील. यासोबतच गॅस सिलिंडरवर ५०० रुपये सबसिडी दिली जाणार आहे. याशिवाय दिवाळी आणि होळीला एक सिलिंडर मोफत दिला जाणार आहे.

दरम्यान, दिल्ली विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शुक्रवारी शेवटची तारीख असून, ५ फेब्रुवारीला दिल्लीतील सर्व ७० विधानसभा जागांवर एकाच वेळी मतदान होणार आहे.

# परस्परातील वाद लवकर सोडवा- सर्वोच्च न्यायालयाने दिले निर्देश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि तेथील सत्ताधारी द्रमुक यांच्यात अनेक महिन्यांपासून सुरू असलेला वाद लवकरात लवकर सोडवावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले. दोन्ही पक्षांना लवकरात लवकर तोडगा काढावा लागेल, अन्यथा यात न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागेल, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती एस. बी. पारडीवाला यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने शुक्रवारी सांगितले की, पुढील सुनावणीपर्यंत हे प्रकरण निकाली निघाल्यास ठीक आहे. अन्यथा आम्ही त्यावर तोडगा काढू. तामिळनाडूत राज्यपालांच्या अधिकारांवर गदा आणणाऱ्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यास राज्यपालांनी नकार दिला आहे.

गेल्या वर्षी तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी राज्यातील काही विद्यापीठांच्या कुलगुरूंची नावे निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. राज्य सरकारने ते बेकायदेशीर ठरवून न्यायालयात धाव घेतली होती. यापूर्वी द्रमुकने राज्यपालांना अनेक विधेयकांना मंजुरी देण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी न्यायालयात केली होती.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते कि खालील परीशीष्टामध्ये नमुद केलेल्या दोन प्लॉट जागा मिळकती त्यांचे विदयामान मालक अ.क्र.१) श्री अमित श्रीधर पराडकर, २) श्री सुधीर श्रीकृष्ण पराडकर, ३) श्री अरुण भालचंद्र पराडकर, ४) सुनिता अरुण पराडकर, आणि अ.क्र ५) श्री सुजित शामराव पराडकर सर्व रा. मु. पो.ता. बारामती, जि.पुणे यांचे एकत्रातील मालकीच्या व वहीवाटीच्या असुन सदर दोनही प्लॉट जागा मिळकती त्यांनी आमचे अशीलांस खरेदी दयावयाचे ठरवलेले असुन त्या दोनही प्लॉट जागा मिळकती हया पुर्णतः निर्वेध, निजोखमी व बोजारहित अशा असलेबाबतची खात्री तसेच सदरील बिगरशेती प्लॉट जागा मिळकती बाबत त्यांनी अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, लिन, डिड, करारनामे, विसारपावती, खरेदीखत व अन्य तबदिलीचा कोणताही व्यवहार केला नसलेबाबतची खात्री व भरवसा विदयामान मालकांनी आमचे अशीलांना दिलेला असुन त्या अनुषंगाने आमचे अशीलांनी सदरील दोनही बिगरशेती प्लॉट जागा मिळकती खरेदी करणेबाबतची बोलणी केलेली आहेत.

तरी सर्व संबंधीत लोकांना या जाहीर नोटीसीने समज देण्यात येते कि, यदाक दाचीत सदरील दोनही बिगरशेती प्लॉट जागा मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, हीतसंबंध वा अधीकार असल्यास अथवा सदरील बिगरशेती प्लॉट जागा मिळकतीबाबत कोणीही विदयामान मालकांशी गहाण, दान, लिज, लिन, डिड, करारनामे, विसारपावती, खरेदीखत, व अन्य तबदिलीचा कोणताही व्यवहार केला असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रशीध्द झालेपासुन पंधरा दिवसाचे आत खालील पत्यावर प्रत्यक्ष व अस्सल कागदपत्रा निशी येउन तशी आमची खात्री पटवुन दयावी. अन्यथा सदरील दोनही बिगरशेती प्लॉट जागा मिळकती या पुर्णतः निर्वेध, निजोखमी व बोजारहित अशा असुन त्या बिगरशेती प्लॉट जागा मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबंध वा अधिकार नसलेचे गृहीत धरुन व जरी असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे गृहीत धरुन व समजुन आमचे अशील हे सदरील दोनही बिगरशेती प्लॉट जागा मिळकतींच्या खरेदी बाबतचा पुढील व्यवहार पुर्ण करतील. त्याकामी हि जाहीर नोटीस असे.

**परीशिष्ठ**

तुकडी व जिल्हा पुणे, पोट तुकडी व तालुका बारामती, मे. दुय्यम निबंधक सो., बारामती यांचे हद्दीतील, मौजे गांव बारामती, जि.पुणे येथील नविन हदवाढीनुसार बारामती नगरपरीषद, बारामती यांचे वाढीव हददीतील मंजूर ले-आउट झालेल्या बिगरशेती असलेल्या दोन प्लॉट जागा मिळकती यांचा :-

| अ. नं. | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | १४१/अ/२ | ४६ | ४.४४.२४ | 00=00 |

**यांसी चतुःसिमा**
**पुर्वेस** :- ओपन स्पेसचा प्लॉट नं. ०१,
**दक्षिणेस** :- प्लॉट नं. ४७,४८,
**पश्चिमेस** :- ९ मीटर रुंद अंतर्गत रस्ता,
**उत्तरेस** :- प्लॉट नं. ४५

| अ. नं. | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| २. | १४१/अ/२ | ४८ | ३.७५.१४ | 00=00 |

**यांसी चतुःसिमा**
**पुर्वेस :-** प्लॉट नं. ४७,
**दक्षिणेस :-** ९ मीटर रुंद अंतर्गत रस्ता,
**पश्चिमेस :-** ९ मीटर रुंद रस्ता,
**उत्तरेस :-** प्लॉट नं. ४६,

येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक असलेल्या दोन प्लॉट जागा मिळकती या त्यामधील असणा-या सर्व झाड, झाडोरा, दगड, माती, धोंडे व इतर तदंगभुत वस्तुंसह तसेच मंजूर ले-आउटमधील पश्चिम आणि दक्षिण बाजुच्या ९ मीटर रुंद सर्व्हिस रोडने जाणेयेणेच्या व वहिवाटीच्या हक्कासह हा या जाहीर नोटीसीचा मुख्य विषय असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

बारामती
दिनांक :-१८/०१/२०२४

सही/-
**ॲड.सौ. अश्विनी वैभव कवडे**
रा. स्वप्नपुर्ती निवास, तांदुळवाडी रोड, सावंत विश्व, बारामती, जि. पुणे ऑफीस :- २/२०, महाविर पथ, बारामती, जि. पुणे - ४१३१०२
मोबाईल नं. ९१६८२०१८१८


### पंजाब पोलिसांकडे ७५ हजार एफआयआर प्रलंबित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाब पोलिसांकडे प्रलंबित असलेले प्रकरण पाहून उच्च न्यायालयही आश्चर्यचकित झाले. न्यायालयाने आता राज्याच्या पोलिस महासंचालकांना या प्रकरणांच्या तपासासाठी कृती आराखडा सादर करण्यास सांगितले आहे. खुनाचा प्रयत्न प्रकरणातील आरोपींचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर हायकोर्टात सुनावणी झाली. ७५ हजारांहून अधिक एफआयआर पोलिसांकडे प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. एका अहवालानुसार, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने निर्धारित वेळेत तपास पूर्ण न केल्यामुळे प्रलंबित ७९ हजार एफआयआरबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे.

## सुरक्षा मोहीम

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**इक्वाडोर** इक्वाडोरमध्ये येथील सुरक्षा यंत्रणांनी अवैध शस्त्रास्त्रे हाती घेतली. या संयुक्त कारवाईवेळी टिपलेले हे तसेच अंमली पदार्थांच्या शोधासाठी विशेष मोहीम छायाचित्र.

### सात कोटींहून अधिक भाविकांचे संगम स्नान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशाच्या प्रयागराज येथे दि. १३ जानेवारीपासून अध्यात्माचा भव्य महोत्सव 'महाकुंभ'ला सुरुवात झाली. देश विदेशातून मोठ्या संख्येने भाविक महाकुंभात आले असून त्रिवेणी संगमात स्नान करण्याता अनुभव घेत आहेत. महाकुंभच्या पहिल्या दिवशी साधारण एक कोटीहून अधिक भाविकांना स्नान केल्याची माहिती होती. त्यानंतर मकर संक्रांतीच्या दिवशी नागा साधूंसह साधारण ३.५० कोटी भाविकांनी पहिले अमृत स्नान केले. मिळालेल्या माहितीनुसार, महाकुंभ सुरु झाल्यापासून दि. १६ जानेवारीपर्यंत अवघ्या सहा दिवसांत तब्बल सात कोटींहून अधिक लोकांनी संगम आणि इतर घाटांवर पवित्र स्नान केले आहे.

# इलेक्ट्रिक वाहनांसाठी लागू होणार नवे धोरण

**परिवहन**

**राज्यात सध्या लागू असलेले इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२२ मध्ये लागू करण्यात आले होते. त्याची मुदत ३१ मार्च रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे त्यानंतर राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण राबवण्यासंदर्भात परिवहन विभागाकडून नवीन धोरण लवकरच जाहीर करण्यात येऊ शकते, अशी माहिती राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी दिलीय.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सध्या अस्तित्वात असलेल्या धोरणाचा परिवहन विभागाकडून आढावा घेतला जातोय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार राज्यात अस्तित्वात आल्यानंतर फडणवीस यांनी विविध विभागांचा पुढील १०० दिवसांचा आढावा घेण्यास प्रारंभ केलाय. त्यामध्ये परिवहन विभागाने सादर केलेल्या आढाव्यामध्ये इलेक्ट्रिक वाहन धोरणाचा आढावा घेऊन नवीन धोरण प्रस्तावित करण्याबाबत परिवहन विभागाने माहिती दिली होती. राज्यातील इलेक्ट्रिक वाहन धोरणाची मुदत मार्च अखेरीस संपत असल्याने हे धोरण नव्याने आखण्यात येत आहे, त्यासाठी जुन्या अस्तित्वात असलेल्या धोरणाचा आढावा घेतला जातोय. २०२५ पर्यंत एकूण नोंद होणाऱ्या गाड्यांपैकी दहा टक्के गाड्या इलेक्ट्रिक वाहने असतील तर २०३० पर्यंत एकूण नोंद होणाऱ्या गाड्यांपैकी ३० टक्के वाहने इलेक्ट्रिक गाड्या असतील, अशी अपेक्षा जुन्या धोरणात नोंदवण्यात आली होती. या अपेक्षेप्रमाणे २०२४ मध्ये नोंदणी झालेल्या वाहनांपैकी नऊ टक्के वाहने इलेक्ट्रिक आहेत.



राज्याच्या परिवहन विभागाने नवीन वाहन इलेक्ट्रिक वाहन धोरण अस्तित्वात आणण्यासाठी विविध मुद्द्यांचा विचार करण्यासाठी एक समिती स्थापन केलीय. ही समिती याबाबतच्या विविध मुद्द्यांचा आढावा घेऊन आपला अहवाल सादर करेल. त्या अहवालावर चर्चा झाल्यानंतर त्या अहवालाला मंजुरी मिळेल. या अहवालाला मंजुरी मिळाल्यानंतर हे नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण अस्तित्वात येईल. यामध्ये एकावेळी चार्जिंग केल्यानंतर इलेक्ट्रिक वाहने किती अंतर कापू शकतील, याबाबतची क्षमता, वाहनांना चार्जिंग करण्यासाठी पुरवण्यात येणारी चार्जिंग व्यवस्था, इलेक्ट्रिक वाहने घेण्यासाठी सरकारतर्फे देण्यात येणारे अनुदान आणि विविध सवलती, इलेक्ट्रिक वाहनांची सुरक्षितता, अशा विविध मुद्द्यांवर ही समिती आपला अहवाल सादर करेल. उच्च न्यायालयाने वाढत्या प्रदूषणाच्या मुद्द्यावर डिझेल वाहनांवर बंदी बाबत सूचना केलीय.

### प्रोत्साहन योजनेला लवकरच अंतिम स्वरूप

● उच्च न्यायालयाच्या या सूचनेचा विचार नवीन धोरण बनवण्यामध्ये केला जाईल, असे परिवहन आयुक्तांनी स्पष्ट केलंय. केंद्र सरकारतर्फे इलेक्ट्रिक वाहन प्रोत्साहन योजना २०२४ ही योजना एप्रिल २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत सुरू होती. त्यामध्ये नंतर दोन महिने वाढ करण्यात आली. आता प्रोत्साहन ३ योजनेला अंतिम स्वरूप मिळेपर्यंत या योजनेला मुदतवाढ मिळालीय.


## PUBLIC NOTICE
### LOST DOCUMENT

Notice is hereby given that the following document has been reported lost and is no longer in the possession of the undersigned:

Document Type: Agreement to Sale (original)

Document Number: 6289/2020 registered at Sub Registrar Haveli No. 23.

Name on the Document: 1) Farida Anwar Qureshi 2) Mumtaj Gudunoor Qureshi and Ashdan Developers Private Limited.

Date and Place of Loss: 10/01/2025 at Fatima Nagar, Pune.

The undersigned hereby declares that the loss of the aforementioned document is genuine and that any individual or entity in possession of the document is requested to return it immediately. Any use, transfer, or tampering with the document by unauthorized parties is prohibited and shall constitute a violation of the law.

If found, please contact:

Name: Farida Anwar Qureshi

Phone Number: +91 9356705276

Email Address: qfarida45@outlook.com

Address: Building C8/24, Pleasant Park Phase 2, Fatima Nagar, Pune, Maharashtra, India, Pin- 411040

Failure to comply with this notice or any unauthorized use of the lost document may result in legal proceedings against the offending party.

This public notice is issued as a precautionary measure to avoid misuse of the lost document.

**Pune**
**Date: 18/01/2025**

**Signature:**
**Sd/-**



"ज्यावेळी संघ विजयी होतो त्यावेळी तुम्ही त्यांच्याबद्दल चांगल बोलता, पण ज्यावेळी पराभूत होतो त्यावेळी टीका करता. मी नेहमीच संघाच्या मागील ५ किंवा ३ वर्षाच्या अहवालाकडे पाहतो. गौतम गंभीर नुकताच व्यवस्थेमध्ये आला आहे, त्यामुळे त्याला वेळ देण्याची आवश्यकता आहे. रोहित शर्माने नुकताच कर्णधार म्हणून भारतासाठी ट्वेंटी-२० वर्ल्ड कप जिंकला. त्याच्या कर्णधारपदाखाली भारताने वन-डे वर्ल्ड कप फायनल खेळली आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने ५ वेळा आयपीएल विजेतेपदक पटकावले आहे."
"या कर्णधाराने मागच्या सामन्यात स्वत:ला संघातून बगळले व नव्या खेळाडूला संधी दिली. तुम्ही त्याच्या खराब फॉर्मकडे पाहाताय, पण मी त्याने याआधी जे काही मागच्या ३, ४ वर्षात मिळवलंय त्याकडे पाहातोय. पण न्यूझीलंडविरूद्ध ३-० ने पराभूत होणे हे माझ्यासाठी धक्कादायक होते."
— युवराज सिंग

Nippon india Mutual Fund
Wealth sets you free

## Mutual Fund Investor Awareness Program

To increase awareness about Mutual Funds, we conduct Investor Awareness Programmes (IAPs) across the country. Schedule of upcoming IAP is as mentioned below:

| Date | Time | Location |
|---|---|---|
| 18th Jan, 2025 | 06:30 Pm | Pune |

**Venue:** Dadasaheb Darode Hall, Near BMCC, Pune - 411004

**Name:** Mr. Aditya Sharma | **Mob. No.:** 9370413808

Nippon Life India Asset Management Limited | CIN : L65910MH1995PLC220793

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

# बीसीसीआय ॲक्शनमोडवर!

## चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आधी संजू सॅमसनचीही चौकशी होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या ६ महिन्यातील भारतीय संघाच्या कामगिरीने सातत्य न दिसल्याने आता बीसीसीआयने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. खेळाडूंसाठी नवी नियमावलीही जाहीर झाली आहे. आता संजू सॅमसनही वादात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या भारतात विजय हजारे ट्रॉफी ही देशांतर्गत वनडे क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. ही स्पर्धा आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरीही चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघ निवडताना निवड समिती लक्षात घेण्याची शक्यता आहे. अशात या महत्त्वाच्या स्पर्धेत संजू सॅमसन खेळलेला नाही. त्यामुळे तो या स्पर्धेत का खेळला नाही, याची चौकशी बीसीसीआयकडून केली जाणार आहे.

संजू सॅमसन केरळकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो. परंतु,



तो विजय हजारे ट्रॉफी २०२४-२५ साठी अनुपलब्ध होता. त्यामुळे बीसीसीआयचे निवडकर्ते त्याच्यावर नाराज आहेत.

केरळ क्रिकेट असोसिएशनने यापूर्वीच सांगितले होते की संजू सॅमसनला निवडण्यात आले नव्हते कारण त्याने स्पर्धेपूर्वी झालेल्या शिबिरासाठी उपलब्ध राहण्यास नकार दिला होता. केरळ क्रिकेट असोसिएशनचे सचिव विनोद एस कुमार यांनी म्हटले होते की त्याच्या उपलब्धतेबाबत अनिश्चितता असल्याने एखाद्या दुसऱ्या खेळाडू त्याची जागा गमावू शकत नाही.

टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार सुत्राने सांगितले की याबाबत चॅम्पियन्स ट्रॉफीचा संघ निवडण्यासाठी निवडकर्त्यांनी चर्चा करणे गरजेचे आहे. सुत्राने सांगितले की 'निवड समिती आणि बीसीसीआय आता देशांतर्गत क्रिकेटबाबत गंभीर आहेत. गेल्यावर्षी इशान किशन आणि श्रेयस अय्यर हे काही देशांतर्गत सामन्यांसाठी कोणतीही परवानगी न घेताच अनुपलब्ध होते, त्यामुळे त्यांना वार्षिक करारही गमवावा लागला होता.'

'अगदी सॅमसनच्या बाबतही तसेच आहे, बोर्डाला किंवा निवडकर्त्यांना त्याने स्पर्धा न खेळण्याचे कारण दिलेले नाही. आत्तापर्यंत जे समजले आहे, त्यावरून त्याने या कालावधीत त्याचा वेळ दुबईत घालवला आहे.'

- सुत्राने सांगितले की 'निवड समितीला सबळ कारण हवे. नाहीतर, त्याची वनडे क्रिकेटसाठी निवड कठीण होईल. सॅमसनचे केरळ क्रिकेट असोसिएशन सोबत फारसे जमत नाही, पण त्यांच्यातील ही समस्या सुटायला हवी, कारण त्याला देशांतर्गत क्रिकेट खेळायचे आहे.'
- 'राज्य संघटना आणि त्याच्यातील गैरसमजांमुळे त्याने सामन्यांना मुकणे, चांगले नाही. तो विजय हजारे ट्रॉफीआधी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत खेळला होता.'
- सॅमसनला २२ जानेवारीपासून इंग्लंडविरुद्ध सुरू होणाऱ्या टी२० मालिकेसाठी भारतीय संघात निवडण्यात आले आहे. मात्र, विजय हजारे ट्रॉफी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संघनिवडीसाठी महत्त्वाची होती. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऋषभ पंत यष्टीरक्षक म्हणून भारताचा एक पर्याय असेल. पण दुसऱ्या पर्यायाचा विचार बीसीसीआय करत असल्याची शक्यता आहे.

## स्विअतेक, सिनरची विजयी वाटचाल कामय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुसरी मानांकित इगा स्विअतेक व प्रथम मानांकित यानिक सिनर या स्टार खेळाडूंनी ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस ग्रँडस्लॅममधील विजयी वाटचाल कायम ठेवली. स्विअतेक हिने महिला एकेरीमध्ये, तर सिनर याने पुरुषांच्या एकेरीत गुरुवारी विजय मिळवला.

पाच वेळची ग्रँडस्लॅम विजेती इगा स्विअतेक हिने ४९व्या स्थानावरील रेबेका स्लामकोवा हिच्यावर ६-०, ६-२ असा सहज विजय मिळवला. स्विअतेक हिने पहिल्या सेटमध्ये निर्विवाद वर्चस्व गाजवले. तिच्या प्रभावी खेळासमोर रेबेकाचा निभाव लागला नाही. अखेर स्विअतेक हिने ६-० अशी बाजी मारली. स्विअतेकने दुसऱ्या सेटमध्येही अव्वल दर्जाचा खेळ केला आणि ६-२ असे यश मिळवले. तिने एका तासामध्ये विजयाला गवसणी घातली. आता तिच्यासमोर २०२१ मधील अमेरिकन ग्रँडस्लॅम विजेती इम्मा राडुकानू हिचे आव्हान असणार आहे.

## नया बाजार हिटर्स संघाने विजेतेपद पटकाविले



**पुणे :** मार्केट यार्ड फ्रेंडस क्रिकेट लीग स्पर्धेत नया बाजार हिटर्स संघाने विजेतेपद पटकाविले. गंगाधाम जवळील एकेएस क्रिकेट अकादमी येथे पार पडलेल्या अंतिम सामन्यात त्यांनी एटी किंग्ज संघाचा अकरा धावांनी पराभव केला. मार्केटयार्ड येथील दि पुना मर्चंटस चेंबरचे सदस्य असलेले व्यापारी व दलालांचे एकुण सोळा संघ सहभागी झाले होते. तीन दिवस पार पडलेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नया बाजार हिटर्स संघाने दहा षटकांत ४ बाद ११७ धावांपर्यंत मजल मारली होती. यामध्ये वंश जैन याच्या ४६ धावांचा वाटा महत्वाचा ठरला. त्याने पाच षटकार ठोकले. विजयासाठी ११८ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेला एटी किंग्जचा संघ सात बाद १०७ धावांपर्यंत मजल मारू शकला. विराज चोरडीयाने ४७ धावांची खेळी करीत सामन्यात रंगत भरली होती. त्याने पाच षटकार व एक चौकार ठोकला. विराज बाद झाल्यानंतर गौरव जैन (१८ धावा ) वगळता एकही एटि किंग्जचा फंलदाज अपेक्षित कामगिरी करू शकला नाही. विजेत्या संघातील वंश जैन याने अंतिम सामन्याचा मानकरीसह, स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट फलंदाज,स्पर्धेचा मानकरीचा मान मिळविला. तर सर्वोत्कृष्ट गोलंदाज मोहित नहार आणि सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचा पुरस्कार मानव चांडक यांनी पटकावला. विजेत्या संघाला दुगड ग्रुप तर्फे काविष दुगड यांच्या हस्ते चषक आणि चितळे बंधू तर्फे 1 लाख रुपये तर उपविजेत्या संघाला गणेश डाळ अँड बेसन मिल चे विनोद ,आशिष आणि अनुप शहा यांच्या हस्ते चषक आणि कमलेशकुमार कांतीलाल यांच्या तर्फे 51 हजार रुपयांचे पारीतोषिक देण्यात आले. पारीतोषिक वितरण प्रसंगी चेंबर चे माजी अध्यक्ष पोपटलाल ओस्तवाल,राजेंद्र गुगळे,राजेश फुलफगर, माजी सेक्रेटरी विजय मुथा उपस्थित होते. या स्पर्धेचे सलग चौथ्या वर्षी मुकेश गोयल,कुणाल ओस्तवाल,जतीन शहा,कमलेश गोयल,सुदर्शन भंडारी आणि सचिन रायसोनी यांनी आयोजन केले होते.

## विदर्भ विजय हजारे ट्रॉफीच्या अंतिम फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वडोदरा :** विदर्भाने प्रथमच विजय हजारे ट्रॉफीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. गुरुवारी वडोदरा येथे खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत या संघाने महाराष्ट्राचा ६९ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना विदर्भाने ३ गडी गमावून ३८० धावा केल्या, प्रत्युत्तरात महाराष्ट्र संघ केवळ ३११ धावा करू शकला.

१८ फेब्रुवारीला अंतिम फेरीत विदर्भाचा सामना कर्नाटकशी होणार आहे. कर्नाटकने उपांत्य फेरीत हरियाणाचा पराभव करत 5व्यांदा विजेतेपदाच्या लढतीत प्रवेश केला. याआधी या संघाने ४ विजेतेपदे जिंकली आहेत. दुसरीकडे, विदर्भाला आधीच विजय हजारे विजेतेपदाची प्रतीक्षा आहे.

कोटंबी स्टेडियमवर महाराष्ट्राने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. ध्रुव शौरे आणि यश राठोड या सलामीच्या जोडीने विदर्भाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी ३५ व्या षटकापर्यंत फलंदाजी करत २२४ धावांची भागीदारी केली. यश ११६ धावा करून बाद झाला आणि दोघांमधील भागीदारी तुटली.



# वेडात मराठी रहिवासी दौडले एकसाथ...!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील सहकारी गृहसंस्थेतील रहिवासी एकत्र येणार म्हटले की खेळ, मनोरंजन किंवा तत्सम काही हलके फुलके कार्यक्रम होणार हे ठरलेले असते; मात्र काही सोसायट्यांमधून या पलिकडे जाऊन सामाजिक भान जागवणारे, रहिवाशांचे आरोग्य जपणारे, लोकशिक्षणातून सहजीवन सूकर करणारे वेगळे उपक्रमही राबवले जातात. याच भूमिकेतून कोथरुडमधील स्वप्नशिल्प सोसायटीमध्ये अलिकडेच आयोजित करण्यात आलेली मॅरेथॉन स्पर्धा चर्चेचा विषय ठरली. विशेष म्हणजे दहा वर्षांपासून ऐंशी वर्षांपर्यंतच्या रहिवाशांनी या स्पर्धेमध्ये सहर्ष सहभाग नोंदवला.

सुमारे दीड हजार रहिवाशांच्या या सोसायटीमध्ये सतत काही ना काही लोकाभिमूख उपक्रम राबवले जातात. अध्यक्ष सतिश भोसरेकर, सरचिटणिस अरविंद लेले आणि क्रीडाप्रमुख किशोर बडवे आणि देवेंद्र राणे यांनी पुढाकार घेऊन रहिवाशांच्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले. गेली काही वर्षे सोसायटीमध्ये या उपक्रमाचे आयोजन केले जात आहे.

यंदा मात्र उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सहभागी सदस्यांना केवळ धावण्यासाठी उद्युक्त न करता आरोग्यभान जागवण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला. स्पर्धेपुर्वी सदस्यांकडून विविध व्यायामप्रकार करुन घेण्यात आले आणि त्यांना त्याबाबतचे महत्व उलगडून सांगण्यात आले. त्यांची पाच किलोमीटर धावण्याची तयारी करुन घेण्यात आली. प्रथेप्रमाणे वाटेत पाण्याचे वाटप, स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी चौकाचौकात स्वयंसेवकांची नियुक्ती, थकलेल्यांना सहकार्य करण्यासाठी, उत्साह वाढवण्यासाठी अवघी कार्यकारी समिती वाटेत उपस्थित असणे आदी पथ्ये पाळत संपूर्ण स्पर्धा काटेकोर पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये श्रीधा मोरे, नेहा बुधकर, निखिला मोरे, वर्षा बुधकर, रुही बजाज, ऐश्वर्या गुणे, मारिया तोडारोवा, अनुराधा चितळे, आयुष नाईक, मंगेश पाठक, अरविंद वाठोडकर, अनय ताम्हणकर, अभिषेक अय्यर, आशिष पानसरे, मनोज जोगळेकर यांनी विशेष यश मिळवले. स्पर्धेनंतर रुचिता गोडसे आणि सोना पालकर यांनी 'कूल डाऊन' व्यायामप्रकार करुन घेत स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांकडून शास्त्रोक्त पध्दतीने उपचारांचे धडे गिरवून घेतले. राष्ट्रगीत गायनाने सुरु झालेली ही जोशभरी स्पर्धा निरोपाच्या दिलखुलास कार्यक्रमाने संपली खरी, पण सहभागी शेकडो रहिवाशांच्या मनात समाधानाची, कौतुकाची भावना निर्माण करुन गेली...

## आर्यन्स् स्पोटर्स, व्हिजन, नाझ फुटबॉल, फोर लायन्स् संघ विजयी



**पुणे :** आर. एम. स्पोटर्स कन्सेप्ट्स आणि पुणे जिल्हा फुटबॉल संघटना (पीडीएफए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेच्या ७ वर्षाखालील गटात आर्यन्स् स्पोटर्स क्लब, द व्हिजन स्पोटर्स, नाझ फुटबॉल ॲकॅडमी आणि फोर लायन्स् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली. कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ७ वर्षाखालील गटाच्या सामन्यामध्ये अशोका फुटबॉल क्लब आणि फोर लायन्स्-रावेत यांच्या संघातील सामना ३-३ अशा बरोबरीत सुटला. अशोका फुटबॉल क्लबकडून व्ह्योम कुदळे याने २ गोल आणि अर्णव उबाळे याने एक गोल केला. फोर लायन्स् संघाकडून अन्ज्योत तोमर याने २ गोल तर, अनघ सकल्ले याने एक गोल केला. सोहम बोलस्तवर याने केलेल्या चार गोलांच्या जोरावर आर्यन्स् स्पोटर्स क्लबने अॅड्रेलाईन स्पोटर्स ब संघाचा ६-० असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये निस्वार्थ पंडीत याने दोन गोल केले.

## पंडित जावडेकर, ट्रूस्पेस, सेनुमेरो हिबुटी संघांचे विजय



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत साखळी फेरीत पंडित जावडेकर डॉल्फिन्स, ट्रूस्पेस नाइट्स, सेनुमेरो हिबुटी चिताज यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

पीवायसी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आनंद परचुरे(४५धावा)याने केलेल्या उत्कृष्ट फलंदाजीसह अजिंक्य मुठे(२-१२) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर पंडित जावडेकर डॉल्फिन्स संघाने ट्रूस्पेस नाइट्स संघावर २ धावांनी विजय मिळवला. दुसऱ्या लढतीत रणजीत पांडे(५६धावा), रौनक ढोले पाटील(४८धावा)यांनी केलेल्या अफलातून फलंदाजीच्या जोरावर गरगंटू डिस्ट्रॉयर्स संघाने पायरेट्स संघावर ३२ धावांनी विजय मिळवत आगेकूच केली.

काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत सौरभ शानबाग(२-२) याने केलेल्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर ट्रूस्पेस नाइट्स संघाने बदामीकर स्टार्स संघाचा ८ गडी राखून पराभव करत पहिला विजय नोंदवला.

रौनक ढोले पाटील(७२ धावा व १-११) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर गरगंटू डिस्ट्रॉयर्स संघाने जीएम टायफून्सचा ४९ धावांनी पराभव करून आपली विजयी घौडदौड कायम ठेवली. प्रतिक हुबळीकर नाबाद ४० धावांच्या खेळीच्या जोरावर सेनुमेरो हिबुटी चिताज संघाने बेलवलकर बॉबकॅट्स संघाचा ३ गडी राखून पराभव केला.

सर्व उत्पादनांवर १५% सुट

१३० हून अधिक उत्पादनांची विस्तृत शृंखला

Since 1974
राज मसाले ®

CELEBRATING 50 YEARS OF TASTE & PURITY..!

राज मसाले ची सर्व उत्पादने मिळण्याची सर्व ठिकाणे

| | |
|---|---|
| **Bharti Enterprises**<br>629, Govind Halwai Chowk, Opp. Ranka Jewelers, **Raviwar Peth, Pune** Mob. : 72767 61763 | **Liyana Traders**<br>Near Shani Mandir, Opp. **Shaniwar Wada, Pune** Mob. : 99233 00782 |
| **Harshada Enterprises**<br>**Old Sangvi, Pune,** Mob. : 86258 85100 | **Yash Enterprises**<br>Kalamkar Complex, Near Jupiter Hospital, **Baner,** Mob. : 83297 67125 |
| **Gauri Enterprises**<br>Shop No.16, B Wing, Ground Floor, Kakde Plaza, **Karvenagar Road, Pune** - 52, Mob. : 96577 17421 | **Muktai Enterprises**<br>At Somvar Peth, Near Rajpurohit , **Tasgaon** - 416 312. Mob: 87963 89698 |
| **Jai Maharashtra Tea**<br>**Kamshet,** Naygon Vadgaon Maval. Mob. : 97665555532 | **Vedant Trading Company**<br>Opp. Sadhana Mall, Near Lonavala Railway Station, **Lonavala,** Mob. : 70833 21475 |
| **Balaji Enterprises**<br>Handewadi, Juna Palkhi Road, **Hadapsar,** Mob. : 9730305070/7020264375 | **Kedareshwar Masale**<br>Near Bhoiraj Ganesh Mandir, Fish Market, **Shirwal,** Mob: 78759 83226 |

Spices | Pickle | Papad | Thecha | Chutney | Instant Mixes | RTC